जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# शहरातील रुग्णसंख्या कमी करण्यासाठी उपाययोजना करा

## आ. संग्राम जगताप; एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीच्या सभेत दिल्या सूचना

नगर - अहिल्यानगर शहरातील नागरिकांचे आरोग्य सदृढ व निरोगी राहणे गरजेचे असून, शहराच्या विकासकामांबरोबरच नागरिकांचे आरोग्यही तितकेच महत्त्वाचे आहे. शहरातील रुग्णसंख्या वाढण्यापेक्षा ती कमी करण्यासाठी महापालिका आरोग्य विभागाने विविध उपाययोजना राबवाव्यात. शासनाच्या माध्यमातून आरोग्याच्या विविध सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. या सुविधा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम सर्वांनी मिळून करावे, असे प्रतिपादन एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीचे अध्यक्ष आ. संग्राम जगताप यांनी केले.


अहिल्यानगर महानगरपालिका विधानसभा मतदारसंघातील एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीच्या सभेत बोलताना आ. संग्राम जगताप.

अहिल्यानगर महानगरपालिका विधानसभा मतदारसंघातील एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची पहिली सभा आ. संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, सिव्हिल सर्जन संजय घोगरे, मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, नगरसेवक कुमार सिंह वाकळे, मनपा आरोग्य समितीचे अध्यक्ष नगरसेवक डॉ. सागर बोरुडे सह अध्यक्ष, नगरसेवक दत्ता गाडळकर, नगरसेवक निखिल वारे, सुरेश बनसोडे, प्रकाश भागानगरे, मयूर बांगरे, महेश तवले, बाळासाहेब पवार, पुष्कर कुलकर्णी, मोहित पंजाबी, विजय पठारे, करण कराळे, संजय ढोणे, रोहन सानप, महेश लोंढे, आकाश कातोरे, सुमित लोंढे, सुजय मोहिते, जितू गंभीर तसेच नगरसेविका रोशनी त्रिंबके, सोनाबाई शिंदे, वंदना ताठे आदी सदस्य, डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मनपा आरोग्य समितीच्या अध्यक्षपदी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, तर सह अध्यक्षपदी नगरसेवक दत्ता गाडळकर यांची निवड करण्यात आली.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, महापालिकेने सुरू केलेले 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' अभियान कौतुकास्पद असून, या माध्यमातून नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती होत आहे. याच पद्धतीने स्वच्छता मोहीम आणि आरोग्यविषयक जनजागृती नागरिकांमध्ये करण्यात यावी. शासनाच्या विविध योजना उपलब्ध असल्या तरी त्याची माहिती सर्वसामान्य नागरिकांना नसते. देशात विविध कायदे मंजूर होतात; मात्र त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती होते, यासाठी लोकसहभागाची खरी गरज आहे. नागरिकांच्या सोयीनुसार आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

महापालिकेच्या मोफत लॅबची वेळ सकाळच्या सत्रात ठेवावी, जेणेकरून ज्येष्ठ नागरिकांना त्याचा लाभ घेता येईल. आरोग्य विभागाचे अधिकारी-कर्मचारी काम करीत असताना समाजाबद्दलची चांगली भावना, नागरिकांशी सुसंवाद, संपर्क आणि कौटुंबिक स्नेह निर्माण करावा. या माध्यमातून आरोग्याच्या चांगल्या सुविधा नागरिकांपर्यंत सहजपणे पोहोचतील. असे आमदार जगताप यांनी सांगितले.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या माध्यमातून शहरात महापालिकेच्या जिजामाता हॉस्पिटलची निर्मिती करण्यात आली आहे. हे हॉस्पिटल खासगी हॉस्पिटलच्या बरोबरीने उभे राहिले आहे. या माध्यमातून नगरकरांना आरोग्याच्या चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी योग्य नियोजन करावे.

पुढील कामासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून दहा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. सर्वांच्या योगदानातून अहिल्यानगर शहरातील आरोग्याच्या सर्व सेवा सक्षम करण्यासाठी उपाययोजना केल्या जातील, असे आमदार जगताप यांनी सांगितले.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, महापालिकेच्या माध्यमातून आरोग्याच्या सुविधा नागरिकांच्या घरापर्यंत घेऊन जाण्याचे काम केले जात आहे. शासनाच्या माध्यमातून मोफत देण्यात येत असलेल्या लसीकरणाची माहिती नागरिकांना द्यावी, जेणेकरून लहान मुलांचे लसीकरण वेळेत पूर्ण होईल. असे त्यांनी सांगितले. यावेळी मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांनी प्रास्ताविक केले.

# मुलांसाठी संपत्ती ठेवताना, ती सांभाळण्याची तयारीही करून घेतली पाहिजे


राजन कुटे

आपल्या मुलांसाठी काहीतरी करून ठेवावं, ही प्रत्येकाची स्वाभाविक इच्छा असते. चांगलं शिक्षण, स्वतःचं घर, काही गुंतवणूक, थोडी जमीन -जुमला किंवा आयुष्यभर कमावलेली संपत्ती पुढच्या पिढीला मिळावी, यासाठी आपण अनेक वर्षं मेहनत करतो. पण संपत्ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचणं आणि ती पुढची पिढी योग्य पद्धतीने सांभाळू शकणं, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

आपण मुलांसाठी पैसा ठेवू शकतो. मालमत्ता ठेवू शकतो. गुंतवणूक ठेवू शकतो. पण त्या पैशाकडे पाहण्याची दृष्टी, निर्णय घेण्याची सवय आणि मिळालेल्या संपत्तीची जबाबदारी घेण्याची तयारी तितकी सहज देता येत नाही. संपत्ती निर्माण करायला अनेक वर्षं लागतात. त्यामागे बचत, संयम, योग्य निर्णय, कधी केलेले त्याग आणि अनेकदा काही संधी सोडण्याची तयारी असते. पण तीच संपत्ती अचानक एखाद्या मुलाच्या हातात आली, तर त्याच्याकडे पैसा असेल; पण त्या पैशामागचा प्रवास आणि त्याची किंमत माहीत असेलच असं नाही.

आपण मुलांना चांगल्या शाळेत पाठवतो, त्यांच्या करिअरसाठी योजना करतो, त्यांच्या भविष्यासाठी पैसे बाजूला ठेवतो. पण पैशांबद्दलचे निर्णय त्यांच्यासोबत किती वेळा बोलतो, हा विचार अनेक कुटुंबांमध्ये मागे राहतो. घरात गुंतवणुकीची चर्चा मोठ्यांच्या खोलीत होते. विम्याची कागदपत्रं एका व्यक्तीकडे असतात. बँक खाती, म्युच्युअल फंड, शेअर्स, मालमत्ता आणि कर्जांची माहितीही अनेकदा एखाद्याच व्यक्तीला असते. बाकीच्यांना एवढंच माहीत असतं की, बाबांनी सगळं केलं आहे किंवा आईला सगळं माहीत आहे. जोपर्यंत सगळं सुरळीत चालू असतं, तोपर्यंत यात काही अडचण वाटत नाही.

पण आयुष्य नेहमी आपल्या नियोजनाप्रमाणे चालत नाही. कधी अचानक एखाद्या व्यक्तीची जबाबदारी दुसऱ्या व्यक्तीवर येते. कधी पालकांच्या अनुपस्थितीत मुलांना आर्थिक निर्णय घ्यावे लागतात. कधी मोठी संपत्ती मिळते आणि तिचं काय करायचं, याचा अनुभव नसतो. अशा वेळी प्रश्न फक्त किती संपत्ती मिळाली, हा राहत नाही; ती सांभाळण्याची तयारी त्याहून महत्त्वाची ठरते.

मुलांना पैशाची किंमत समजण्यासाठी प्रत्येक गोष्ट नाकारून मोठं करण्याची गरज नाही. पण पैसा सहज मिळतो आणि पैसा टिकवण्यासाठी शहाणे निर्णय घ्यावे लागतात, यातील फरक त्यांना समजणं आवश्यक आहे. लहानपणी बचतीची सवय, मोठं होताना खर्च आणि गरज यातील फरक, कमावायला सुरुवात केल्यावर गुंतवणुकीची ओळख आणि पुढे कुटुंबाच्या आर्थिक निर्णयांमध्ये सहभाग-ही तयारी हळूहळू होत जाते. त्यासाठी मुलांनी आपल्या प्रत्येक गुंतवणुकीचा तपशील समजून घ्यायलाच हवा, असं नाही. पण घराची आर्थिक रचना त्यांना माहीत असणं महत्त्वाचं आहे.

कुठे पैसा आहे, कोणत्या उद्देशासाठी आहे, कोणती कर्जं आहेत, कोणता विमा आहे, कोणत्या गुंतवणुकीला किती काळ द्यायचा आहे आणि अचानक एखादी जबाबदारी आली तर निर्णय कुठून सुरू करायचा-इतकी माहितीही पुढच्या पिढीसाठी मोठी संपत्ती ठरू शकते. कारण वारसाहक्काने मिळालेला पैसा आर्थिक शहाणपणाची हमी देत नाही.

आपण मुलांसाठी संपत्ती निर्माण करतो, तेव्हा आपण फक्त पैसा ठेवत नसतो. आपण त्यांच्यासाठी भविष्यातील शक्यता तयार करत असतो. त्या शक्यता टिकून राहाव्यात, यासाठी संपत्तीबरोबर आर्थिक समजही पुढे जाणं गरजेचं आहे. कधी कधी मुलांसाठी केलेली सर्वात चांगली आर्थिक तयारी म्हणजे त्यांच्या नावावर अजून एक गुंतवणूक करण्यापेक्षा, त्यांच्यासोबत आपल्या आर्थिक निर्णयांबद्दल एक साधा आणि प्रामाणिक संवाद करणं असतं.

आज आपण त्यांच्यासाठी पैसा कमावतो आहोत. उद्या तो पैसा त्यांच्या हातात असेल. त्या दिवसासाठी त्यांना तयार करणंही आपल्या संपत्ती नियोजनाचाच एक भाग आहे. आणि ही तयारी आपण करून घेतली आहे ना, हेही वेळोवेळी पाहणं तितकंच महत्त्वाचं आहे.

संपत्ती पुढच्या पिढीला देता येते; पण ती योग्य पद्धतीने सांभाळण्याची तयारी करून घेतली आहे ना, हेही पाहिलं पाहिजे.

स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

- **राजन कुटे**, अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०


**उदयनराजे व कु. श्रुतिका कोतकर उच्च शिक्षणासाठी लंडन येथे रवाना**

केडगाव येथील उद्योजक भानुदास कोतकर यांचे नातू तसेच संदीप उद्योग समूहाचे संचालक व माजी महापौर संदीप कोतकर यांचे चिरंजीव उदयनराजे आणि कन्या श्रुतिका हे पुढील उच्च शिक्षणासाठी लंडन येथे नुकतेच रवाना झाले आहेत. चि. उदयनराजे व कु. श्रुतिका यांना लंडन येथे रवाना होण्यासाठी मुंबई येथून विमान होते. यावेळी विमानतळावर त्यांना निरोप देण्यासाठी कोतकर परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते. यावेळी त्यांना कोतकर परिवार तसेच हितचिंतकांच्यावतीने भावी यशासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# मुकुंदनगरच्या नागरी सुविधा बंद प्रकरणात दोषींना पाठीशी घालण्याचे काम : नगरसेवक शम्स खान



नगर - राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान हे अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक आयोगाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नागरिकांशी भेटीचेही आयोजन करण्यात आले होते. मात्र, मुकुंदनगर, फकीरवाडा व दर्गा दायरा परिसरातील बंद करण्यात आलेल्या नागरी सुविधांबाबत स्थानिक नागरिकांशी चर्चा करून वस्तुस्थिती जाणून न घेता प्रशासनाकडून देण्यात आलेल्या माहितीच्या आधारे परस्पर खुलासा करण्यात आल्याचा आरोप नगरसेवक शम्स खान यांनी केला आहे.

महापालिका कामगार युनियनने महापालिकेत आंदोलन केले होते. त्यादरम्यान मुकुंद नगर, फकीरवाडा व दर्गा दायरा भागातील नागरिकांना पाणीपुरवठा, स्वच्छता व घंटागाडी यांसारख्या नागरी सुविधांपासून वंचित राहावे लागले. या पार्श्वभूमीवर राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना या प्रकाराबाबत खुलासा केला.

यावेळी काही नगरसेवक व महापालिका अधिकाऱ्यांनी आपल्याला असा प्रकार घडलेला नसल्याचे सांगितले असून, महापालिका प्रशासनाला बदनाम करण्यासाठी संबंधित तक्रार करण्यात आल्याचे सांगितल्याचा खुलासा प्यारे खान यांनी केल्याचे नगरसेवक शम्स खान यांनी म्हटले आहे.

नगरसेवक शम्स खान यांनी म्हटले आहे की, मुकुंदनगर परिसरातील नागरी सुविधा बंद करण्यात आल्या असताना त्याबाबत स्थानिक नागरिकांशी चर्चा करून वस्तुस्थिती जाणून घेणे आवश्यक होते. मात्र, सत्य परिस्थितीची कोणतीही खातरजमा न करता प्रशासनाने दिलेल्या माहितीवर विश्वास ठेवून परस्पर खुलासा करण्यात आला. यामुळे नागरी सुविधा बंद करणाऱ्या दोषींना पाठीशी घालण्याचे काम झाले असल्याचा आरोपही त्यांनी केला.

मुकुंदनगर परिसरातील पाणीपुरवठा, स्वच्छता व घंटागाडी बंद करण्यात आल्याबाबत स्थानिक नगरसेवकांनी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्याशी मोबाईलवर संपर्क साधून विचारणा केली होती. त्यावेळी आयुक्त डांगे यांनी आपण बाहेरगावी असल्याचे सांगत पाणीपुरवठा विभागाशी बोलतो, असे सांगितल्याचे नगरसेवक शम्स खान यांनी नमूद केले. त्यानंतर सदर भागातील वॉलमन यांच्याशी संपर्क साधला असता, पाणीपुरवठा विभागाने पाणी बंद केले आहे, असे उत्तर मिळाल्याचा दावा त्यांनी केला. यासंदर्भातील कॉल रेकॉर्डिंग आपल्याकडे उपलब्ध असल्याचेही शम्स खान यांनी सांगितले.

मुकुंदनगर परिसरातील नागरिकांच्या नागरी सुविधा प्रत्यक्षात बंद करण्यात आल्या असतानाही राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी याबाबत चुकीची माहिती दिल्याची माहिती नगरसेवक शम्स खान यांनी दिली.

त्यामुळे संबंधित प्रकरणाची प्रत्यक्ष वस्तुस्थिती स्थानिक नागरिकांकडून जाणून घेऊनच भूमिका स्पष्ट करणे गरजेचे होते.

# निकामी झालेला हात घेऊन चिमुकला पोहोचला जिल्हाधिकारी कार्यालयात

## वैद्यकीय निष्काळजीपणाची चौकशी करून डॉक्टरावर कारवाईची आरपीआय (गवई) ची मागणी; पालकांचा डॉक्टरांवर गंभीर आरोप

नगर - पाथर्डी तालुक्यातील करंजी-भोसे रोड परिसरातील एका हॉस्पिटलमध्ये उपचार घेतल्यानंतर अवघ्या नऊ वर्षांच्या चिमुकल्याच्या उजव्या हातावर कायमस्वरूपी परिणाम झाल्याचा गंभीर आरोप त्याच्या पालकांनी केला आहे. उपचारादरम्यान झालेल्या कथित निष्काळजीपणामुळे मुलाच्या हातातील रक्तवाहिन्यांना इजा होऊन हाताचा पंजा व बोटांची हालचाल प्रभावित झाल्याचा दावा पालकांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई)च्या वतीने करण्यात आली.


नऊ वर्षांच्या चिमुकल्याच्या उजव्या हातावर कायमस्वरूपी परिणाम झाल्याचा गंभीर आरोप त्याच्या पालकांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई)च्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली.

विशेष म्हणजे, आपल्या मुलावर झालेल्या अन्यायाची व्यथा प्रशासनासमोर मांडण्यासाठी पालकांनी स्वतःचा हात निकामी झालेल्या नऊ वर्षांच्या मुलालाच जिल्हाधिकारी कार्यालयात आणले. पालकांनी दिलेल्या निवेदनानुसार, ८ ऑगस्ट २०२६ रोजी जोहिर गायकवाड हा खेळताना पडल्याने त्याच्या उजव्या हाताला गंभीर दुखापत झाली. तपासणी केल्यानंतर हाताचे हाड फ्रॅक्चर झाल्याचे निदान झाले. त्यानंतर संबंधित हॉस्पिटलमध्ये त्याच्यावर प्लास्टर करण्यात आले. मात्र, प्लास्टरनंतर मुलाच्या हातात तीव्र वेदना सुरू झाल्या आणि हाताची स्थिती बिघडत गेल्याचे पालकांचे म्हणणे आहे.

मुलाला पुन्हा संबंधित डॉक्टरांकडे नेण्यात आले. त्यावेळी प्लास्टर काढण्यात आले. प्लास्टर काढण्यासाठी बराच वेळ लागला आणि त्यानंतर हातातून रक्तस्राव झाल्याचे पालकांनी निवेदनात म्हटले आहे. हातातील रक्तवाहिन्यांना इजा झाल्यामुळे रक्तपुरवठ्यावर परिणाम झाला आणि त्यानंतर गंभीर संसर्गाची परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

मुलाची प्रकृती चिंताजनक झाल्यानंतर त्याला अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. तेथून पुढील उपचारासाठी पुण्यातील रुग्णालयात जाण्याचा सल्ला देण्यात आला. मात्र, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने पुढील उपचारासाठी अहिल्यानगर शहरातील एका खासगी रुग्णालयात मुलाला दाखल करण्यात आले. तेथे तपासणी केल्यानंतर आणखी विलंब झाला असता हात कापण्याची वेळ आली असती, अशी माहिती डॉक्टरांनी दिल्याचा दावा पालकांनी केला आहे. त्यानंतर मुलावर शस्त्रक्रिया करण्यात आली. पुढील काळात त्याच्यावर प्लास्टिक सर्जरीही करण्यात आली. उपचार करूनही हातातील नसा व पंजाच्या हालचालींवर कायमस्वरूपी परिणाम झाल्याचे पालकांचे म्हणणे आहे. 'मुलाच्या हातावर उपचारासाठी आलो; मात्र त्याचे संपूर्ण भविष्यच धोक्यात आले,' असे पालक म्हणाले. पुढील काळात मुलाला नियमित थेरपीची आवश्यकता असून त्यासाठी मोठा आर्थिक खर्च अपेक्षित असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, संबंधित डॉक्टरांची पात्रता व त्यांनी केलेल्या उपचारांची वैद्यकीयदृष्ट्या चौकशी करण्यात यावी, तसेच उपचारामध्ये वैद्यकीय निष्काळजीपणा झाला आहे का, याची तज्ज्ञ समितीमार्फत तपासणी करावी, अशी मागणी आरपीआय (गवई)च्या पदाधिकाऱ्यांनी केली.

या प्रकरणी संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, तसेच दोष सिद्ध झाल्यास संबंधितांची वैद्यकीय नोंदणी परवाना याबाबत नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी आपीआयचे शहर जिल्हा कार्याध्यक्ष दानिश शेख, शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, विजय शिरसाठ, गुलाम अली शेख, प्रतीक बारसे यांच्यासह पीडित मुलाचे पालक उपस्थित होते.

# प्रमिलाताई भांबरकर यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - कल्याण रोड, गणेश नगर येथील रहिवासी कु.प्रमिलाताई बबनराव भांबरकर यांचे ११ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात दोन भाऊ, एक बहीण, दाजी, भावजई, भाचे, पुतणे असा परिवार आहे. प्रेस फोटोग्राफर, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, एस टी चालक सतिश भांबरकर यांच्या त्या मोठी बहिण होत. त्यांनी डॉ.देशपांडे हॉस्पिटल व डॉ. तांबोळी हॉस्पिटल येथे नर्स म्हणून २५ वर्ष सेवेचे कार्य केले.

# मंगलबाई बोंबले यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर - बोंबलेनगर, बेलापूर रोड ऐनतपूर शिवार श्रीरामपूर येथील रहिवासी सौ. मंगलबाई रावसाहेब बोंबले (वय ७०) यांचे १२ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर श्रीरामपूर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पती, २ मुले, २ मुली, सुना, दिर, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी रावसाहेब बोंबले यांच्या पत्नी, मुळा प्रवरा क्षेत्रातील ओमसाई दूध संकलन केंद्राचे मालक दादासाहेब व नानासाहेब बोंबले यांच्या मातोश्री, नामदेव बोंबले यांच्या भावजई, आप्पासाहेब, विजय, अविनाश, सुभाष, संतोष व गणेश बोंबले यांच्या त्या चुलती होत.

# मित्रांच्या त्रासाला कंटाळून तरुणाने केली आत्महत्या

## केडगावमधील घटना, दोघांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल

नगर - केडगाव परिसरातील संभाजी चौक, बडार गल्लीत मित्रांच्या सततच्या शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळून एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. गणेश शंकर धोत्रे असे मयत तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोघा आरोपींविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सागर शंकर धोत्रे (वय २२, रा. संभाजी चौक, बडार गल्ली, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, त्यांचा मयत भाऊ आणि आरोपी हे एकमेकांचे परिचित मित्र होते. मात्र, आरोपी शुभम घोडेकर आणि विराज गिरवले (रा. भूषणनगर, केडगाव, अहिल्यानगर) हे मयत तरुणाला वारंवार मारहाण करून नाहक त्रास देत असत.

घटनेच्या आदल्या दिवशी म्हणजेच ८ सप्टेंबर २०२६ रोजी देखील आरोपींनी मयत तरुणाला शारीरिक व मानसिक त्रास दिला होता. या सततच्या त्रासाला आणि अपमानाला कंटाळून मयताने ९ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास केडगावातील एका पडक्या घरात गळफास घेऊन आपले जीवन संपवले.

फिर्यादीच्या जबाबावरून कोतवाली पोलीस ठाण्यात बी.एन.एस. कलम १०७ आणि ३(५) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे हे करत आहेत. स्थानिक पोलिसांकडून घटनेचा अधिक तपास सुरू असून आरोपींचा शोध घेतला जात आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गणेशोत्सवात कर्णकर्कश डीजेला लगाम; पारंपरिक ढोल-ताशांना परवानगी

## ध्वनीप्रदूषण रोखण्याची मागणी; नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा : साहेबराव काते

नगर - महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा जपणारा सार्वजनिक गणेशोत्सव हा भक्ती, श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक ऐक्याचा उत्सव आहे. मात्र गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या आवाजातील डीजे व कर्णकर्कश ध्वनिक्षेपकांमुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाला आळा घालावा आणि पारंपरिक ढोल-ताशा व ढोल पथकांना शासनाच्या नियमानुसार परवानगी द्यावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा उपाध्यक्ष साहेबराव शंकरराव काते यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.


गणेशोत्सवाच्या काळात कर्णकर्कश ध्वनिक्षेपकांमुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाला आळा घालावा अशी मागणी साहेबराव शंकरराव काते यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले.

गणेशोत्सवाच्या काळात वाढणाऱ्या ध्वनीप्रदूषणामुळे ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, विद्यार्थी, लहान मुले तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. त्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सवादरम्यान कर्णकर्कश आवाजातील डीजे व ध्वनीप्रदूषण करणाऱ्या साउंड सिस्टिमला परवानगी देऊ नये, अशी मागणी काते यांनी निवेदनातून केली आहे.

शासन व न्यायालयाने निश्चित केलेल्या ध्वनीमर्यादा तसेच ध्वनिक्षेपक वापराच्या वेळेच्या नियमांचे काटेकोर पालन करण्यात यावे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या गणेश मंडळे अथवा संबंधितांवर नियमानुसार कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

डीजेवरील निर्बंधांचा उद्देश गणेशोत्सवातील आनंद किंवा सांस्कृतिक कार्यक्रमांना विरोध करणे नसून कर्णकर्कश ध्वनीप्रदूषणाला आळा घालणे हा आहे. त्यामुळे गणेशोत्सवातील पारंपरिक सांस्कृतिक परंपरांना प्रोत्साहन देत ढोल-ताशा, ढोल पथक, लेझीम, भजन-कीर्तन तसेच आवश्यकतेनुसार ध्वनिक्षेपकांना निर्धारित ध्वनीमर्यादा व वेळेच्या अधीन राहून परवानगी द्यावी, अशी मागणी काते यांनी केली.

गणेशोत्सव हा आनंद, भक्ती, संस्कृती आणि सामाजिक सलोख्याचा उत्सव असून तो कोणाच्याही त्रासाचे कारण ठरू नये. त्यामुळे प्रशासनाने कर्णकर्कश डीजेवर नियंत्रण ठेवून ध्वनीप्रदूषणास प्रतिबंध करावा आणि पारंपरिक सांस्कृतिक उपक्रमांना नियमांच्या चौकटीत प्रोत्साहन द्यावे, अशी मागणी साहेबराव काते यांनी व्यक्त केली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### मुलांची वाढवा उंची...

लहान मुलांची उंची ही फक्त औषधाने वाढत नाही, तर त्यासाठी संतुलित पोषण, पुरेशी झोप, रोजचा व्यायाम आणि अनुवंशिकता या चार गोष्टी सगळ्यात महत्त्वाच्या असतात. वयाच्या १ ते १८ वर्षांपर्यंत मुलांची वाढ खूप वेगाने होते आणि या काळात शरीराला प्रथिने, कॅल्शियम, व्हिटॅमिन डी, झिंक आणि आयर्न यांची खूप गरज असते. रोजच्या आहारात दूध, अंडी, डाळी, सोयाबीन, हिरव्या पालेभाज्या, फळे विशेषतः केळी, पेरू, संत्री आणि सुका मेवा यांचा समावेश असेल तर हाडांची वाढ चांगली होते. व्हिटॅमिन डी साठी सकाळच्या कोवळ्या उन्हात १५ ते २० मिनिटे खेळणे गरजेचे आहे कारण व्हिटॅमिन डी शिवाय कॅल्शियम शरीरात शोषले जात नाही. उंची वाढीसाठी झोप हा सगळ्यात दुर्लक्षित घटक आहे, मुलांनी रात्री ८ ते १० तास गाढ झोप घेणे आवश्यक आहे कारण झोपेतच ग्रोथ हार्मोन जास्त प्रमाणात तयार होतो. यासोबतच दोरीच्या उड्या मारणे, पोहणे, बास्केटबॉल, लटकणे आणि ताडासन सारखे ताण देणारे योगासन याने हाडांना ताण मिळून उंची वाढण्यास मदत होते. बाजारात उंची वाढवण्याच्या नावाने अनेक औषधे आणि पावडर विकल्या जातात, पण लक्षात ठेवा कोणतेही औषध थेट उंची वाढवत नाही. डॉक्टर सहसा गरज असेल तरच कॅल्शियम, व्हिटॅमिन डी३, मल्टीव्हिटॅमिन किंवा प्रोटीन सप्लिमेंट लिहून देतात आणि तेही मुलाच्या वय, वजन आणि रक्त तपासणीनुसार. हार्मोनची इंजेक्शन किंवा स्टिरॉइड असलेली औषधे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय देणे खूप धोकादायक ठरू शकते आणि त्याने यकृत व किडनीवर दुष्परिणाम होऊ शकतो. जर तुमच्या मुलाची उंची वयाच्या मानाने खूपच कमी असेल, भूक लागत नसेल किंवा वारंवार आजारी पडत असेल तर बालरोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे आणि गरज पडल्यास ग्रोथ चार्ट व व्हिटॅमिन तपासणी करून घेणे हा योग्य मार्ग आहे. घरीच औषध सुरू करण्यापेक्षा चांगला आहार, रोजचा खेळ आणि वेळेवर झोप यावर लक्ष दिले तर नैसर्गिकरित्या उंची वाढण्यास नक्कीच मदत होते. याबद्दल अधिक माहितीसाठी तुम्ही तुमच्या जवळच्या बालरोगतज्ञ किंवा सरकारी आरोग्य केंद्रातील डॉक्टरांशी बोलावे.

## पाककला

### पनीर पेरिपेरी राईस

**साहित्य :** शिजलेला बासमती भात २ वाट्या, पनीर १०० ग्रॅम चौकोनी चिरलेले, शिमला मिरची १/२ बारीक चिरलेली, बारीक चिरलेला कांदा १ लहान, स्वीट कॉर्न १/४ वाटी उकडलेले, नगबटर १ चमचा, १ चमचा तेल, १ चमचा पेरिपेरी मसाला, १/२ चमचा काळी मिरी पावडर, १/२ चमचा जिरे पावडर, १ चमचा टोमॅटो केचप, १ चमचा चिली फ्लेक्स, १/४ चमचा मीठ, चवीनुसार बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा

**कृती :** कढईत तेल आणि बटर गरम करा. त्यात चिरलेला कांदा, शिमला मिरची आणि स्वीट कॉर्न घालून २ मिनिटे परता. त्यात पनीरचे तुकडे, पेरिपेरी मसाला, काळी मिरी पावडर, जिरे पावडर, चिली फ्लेक्स आणि मीठ घालून मिश्रण एकजीव करा. आता त्यात टोमॅटो केचप घाला. तयार मिश्रणात शिजलेला भात घालून जाडसर थर देऊन हलक्या हाताने मिक्स करा. भाताची शिते मोडणार नाहीत याची काळजी घ्या. मध्यम आचेवर २ ते ३ मिनिटे परता. वरून कोथिंबीर घाला. तयार पनीर पेरिपेरी राईस गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### 'मास्टर बेडरुम'साठी

* बेडरूमचा दरवाजा उत्तर किंवा पूर्व भिंतीवर असावा, आणि बेड दरवाजाच्या समोर दिसू नये.

* मोठी खिडकी पूर्वेला किंवा उत्तरेला ठेवा, जेणेकरून सकाळचे ऊन येईल.

* नवरा-बायकोच्या बेडवर एकच मोठी गादी असावी. दोन वेगवेगळ्या गाद्या जोडल्याने नात्यात दुरावा येतो असे मानतात.

## सौंदर्य

पावसाळ्यात केस चमकदार आणि सुटसुटीत ठेवण्यासाठी रुंद दात्यांचा कंगवा वापरा. तसेच दुसऱ्याचा कंगवा वापरणे टाळा.

## सल्ला

फिनेल, फरशी पुसण्याचे लिक्विड नेहमी टॉयलेटच्या बाहेरच्या स्टोअरमध्ये किंवा बाल्कनीत बंद कपाटात ठेवा. किचनच्या ओट्याखाली कधीही ठेवू नका.

**संकलक :** ॲड. सौ. पूजा गुंदेचा

# दैनिक पंचांग

रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६

**उत्तरा रवि, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, हस्त १३।०७, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. २१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज कामात यश आणि धनलाभ होईल.

**वृषभ :** कुटुंबात आनंद राहील. प्रवासाचा योग आहे.

**मिथुन :** वाद होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला.

**कर्क :** आर्थिक फायदा होईल. मित्रांची मदत मिळेल.

**सिंह :** मान-सन्मान वाढेल. प्रेमात गोडवा येईल.

**कन्या :** अडकलेले काम पूर्ण होईल. चांगली बातमी मिळेल.

**तूळ :** व्यवसायात नफा होईल.

**वृश्चिक :** कामाचा ताण राहील. संध्याकाळी दिलासा मिळेल.

**धनु :** परीक्षेत यश मिळेल. खर्च वाढेल.

**मकर :** पैसे अडकू शकतात. मागील उधारी वसुल होईल.

**कुंभ :** नवीन मित्र भेटतील. आरोग्य उत्तम राहील.

**मीन :** इच्छा पूर्ण होईल. दिवस शुभ आहे.

# शब्दगंध क्र. ७५१५

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ■ | ५ | ६ |
| ७ | | | | ■ | ८ | | |
| | ■ | | ■ | ९ | | | ■ |
| ■ | १० | ■ | ११ | | | ■ | १२ |
| १३ | | | | ■ | ■ | १४ | |
| १५ | | ■ | १६ | १७ | | | |
| १८ | | | ■ | | ■ | ■ | |
| १९ | | ■ | २० | | | | |

**आडवे शब्द :-** १) लढाईचे मैदान; रण; रणांगण; युद्धभूमी ५) वडिलांचे संबोधन ७) दुधाचे दही करण्यासाठी त्यात घातलेला आंबट पदार्थ ८) एक विषम संख्या ९) पुरवठा; संग्रह; साठा ११) पाणवठ्याला आढळणारा एक पक्षी १३) घाई; त्वरा; धांदल १४) प्रतिस्पर्ध्यावरील वरचढपणा किंवा विजय १५) अरण्य; जंगल; रान; कानन १६) तप्त; तापलेले; रसरशीत १८) कटी; कंबर १९) मग्न; लीन; रममाण; गुंग २०) आठवड्यातील एक दिवस

### शब्दगंध क्र. ७५१४ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | शो | क | ■ | द | श | र | थ |
| क | ण | ■ | स | म | ■ | पा | वा |
| ब | ■ | घा | ■ | न | क | टा | ■ |
| र | ज | नी | श | ■ | न | ■ | वा |
| ■ | ग | ■ | म | न | क | व | डा |
| आ | जी | व | न | ■ | ■ | न | ■ |
| बा | ब | र | ■ | स | ह | वा | स |
| ज | न | ■ | स | म | र | स | ■ |

**उभे शब्द :-** १) भास्कर; रवि; सूर्य; दिनकर २) नाश पावलेला भाग ३) मातीचे मोठे भांडे किंवा मोठा डेरा ४) भक्त किंवा सेवक यांचा समूह ५) वृत्त; वार्ता; समाचार; खबर ६) एक सम संख्या; एक तपातील वर्षे ८) सारा; सर्व; संपूर्ण ९) एक मुस्लीम आडनाव १०) संयुक्तपणे केलेला विचार किंवा कट ११) काख १२) मध्ये खंड न पडता एकसारखी पडणारी धार १३) कमी वेळेत; जलदी १४) एक कीटक; मक्षिका १७) अखंड; न तुटता

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** वेळेला पैसा मानू नका, वेळ पैशापेक्षा मौल्यवान आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### भिंतीवरचं घड्याळ न दिसणाऱ्या वेळेला कसं पकडून काट्यांनी दाखवतं?

खरं तर वेळ ही अशी वस्तू नाही की जिला हाताने पकडता येईल, ती आपल्याला दिसत नाही पण ती सगळीकडे सारखी चालू असते. पूर्वी माणसांना वेळ कळतच नव्हती, मग त्यांनी सूर्याकडे बघितलं. सकाळी सूर्य आला की दिवस, मावळला की रात्र, सावली लहान-मोठी झाली की वेळ बदलली असं त्यांना कळलं.

मग त्याच सावलीवरून त्यांनी पहिलं घड्याळ बनवलं. नंतर माणूस अजून हुशार झाला आणि त्याच्या लक्षात आलं की पृथ्वी स्वतःभोवती सारख्याच वेगाने फिरते, म्हणून त्याने त्या फिरण्याचे छोटे तुकडे केले आणि त्याला नाव दिलं तास, मिनिट आणि सेकंद.

भिंतीवरचं घड्याळ म्हणजे त्या न दिसणाऱ्या वेळेला मोजण्याचं एक यंत्र आहे. त्याच्या आतमध्ये एक छोटी बॅटरी आणि काटे फिरवणारी चक्रं असतात जी अगदी ठरलेल्या वेगाने सारखी फिरत असतात, म्हणजे जशी पृथ्वी फिरते तसंच ते पण फिरतं.

थोडक्यात घड्याळ वेळेला पकडत नाही तर वेळ जशी पुढे जाते तसं ते फक्त आपल्याला दाखवतं की आता किती वेळ झाला, जसं तापमापी ताप दाखवतं पण तापाला पकडत नाही अगदी तसेच असते घड्याळाचेही.

### शेवटचा लाडू कोणाचा?

एकदा एका घरात आजीने बेसनाचे चार गरम लाडू केले. घरात आई, बाबा, छोटा चिंटू आणि आजी असे चौघे होते. आजीने ताटात चार लाडू ठेवले आणि म्हणाली, प्रत्येकाने एकेक घ्या. सगळ्यांनी एकेक लाडू घेतला. चिंटूने तर पटकन खाऊन टाकला. त्याला लाडू खूप आवडला होता. पण ताटात अजून एक लाडू शिल्लक होता. आता प्रश्न पडला, शेवटचा लाडू कोणाचा?


चिंटू मनात म्हणाला, मी सगळ्यात लहान आहे, मलाच मिळायला पाहिजे. आईने विचार केला, मी दिवसभर स्वयंपाक केला, मी घेते.

बाबा म्हणाले, मी दमून आलोय, मला दे. आजी काहीच बोलली नाही, फक्त हसत होती. तेवढ्यात चिंटूने एक युक्ती केली. तो म्हणाला, आपण असं करूया, जो सगळ्यात आधी झोपेल त्याला हा लाडू मिळेल.सगळे आपापल्या जागी जाऊन झोपायचे नाटक करू लागले. घरात अगदी शांतता झाली.पाच मिनिटांनी आजी हळूच उठली, शेवटचा लाडू घेतला आणि त्याचे चार छोटे तुकडे केले. तिने प्रत्येकाच्या हातावर एक तुकडा ठेवला. सगळे डोळे उघडून बघायला लागले.

आजी म्हणाली, अरे, झोपेत लाडू खायला कसा येणार? लाडू हा वाटून खाल्ला की जास्त गोड लागतो. सगळ्यांनी आपापला छोटा तुकडा खाल्ला आणि सगळे हसले. त्या छोट्या तुकड्यात चार लाडवांपेक्षा जास्त गोडी होती.

तात्पर्य : आनंद हा वाटून घेतल्याने वाढतो आणि स्वार्थ केल्याने भांडणं होतात.

## आत्मशक्ति



### जीवनाची कहाणी

राजाला वाटले की लाकूडविक्या आता श्रीमंत झाला असेल परंतु तो पूर्वीसारखाच गरीब दिसून आला हे पाहून तो विचारात पडला. राजाने विचारले, चंदनाची लाकडे विकूनही तू श्रीमंत कसा झाला नाहीस ? ही झाडे तर फार किंमती आहेत! राजाने त्याची चूक त्याच्या लक्षात आणून दिली. आपण अतिशय चांगली संधी वाया घालविली, हे लाकूडविक्याला पटले. अजून तर काही चंदनाचे झाड शिल्लक होते. त्यांना चढ्या भावाने विकून त्याने जीवन चांगल्या प्रकारे घालविले. लाकूडविक्याची गोष्ट ही जणू आमच्याच जीवनाची कहाणी आहे. चंदनवृक्ष आमच्या श्वासासमान आहेत. लाकूडविक्याने कवडी किंमतीने चंदनवृक्ष वाया घालविले. त्याप्रमाणे आम्ही सुद्धा बहुमोल श्वास व्यर्थ रीतीने वाया घालवित आहोत. अध्यात्मिक खजिना घेण्याऐवजी आम्ही आमचा वेळ विनाकारण व्यर्थ कामात घालवीत आहोत. वेळ बहुमोल आहे. गेलेली वेळ पुन्हा येत नाही. आम्ही वेळेचा सदुपयोग करावयास पाहिजे. आम्ही असे केले तर आम्हाला ते आध्यात्मिक खजिने मिळतील, की ज्यांचा आम्ही स्वप्नात सुद्धा विचार केला नसेल.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### टिकेची ऊर्जा

सुरेश ओबेरॉय : त्याने लोकांवर टीका नाही केली तरी तो कदाचित शासनावर, अत्यावश्यक सेवासुविधांवर, जगातील परिस्थितीवर किंवा देवावरही टीका करेल.

शिवानीदीदी : जर कोणी आपल्यावर टीका करत असेल, तर त्या व्यक्तीवर आपलं नियंत्रण नसल्याने आपण तिला बदलू शकत नाही. आपण पण अशा परिस्थितीत स्थिर राहायचं की स्वतः वर परिणाम करून घ्यायचा हा पर्याय आपल्याकडे उपलब्ध असतो. जी व्यक्ती टीका करते तिच्या मनात इतर तिच्या आज्ञेचं पालन करतील की नाही अशी सूक्ष्म भीती असते. कारण टीका करणं आणि ऊर्जेवर नियंत्रण ठेवणं या दोन्ही गोष्टी एकत्र असतात. सततचा संताप आणि भीती यांमध्ये खूप वेदना आहेत. त्यामुळे त्या व्यक्तीची आध्यात्मिक शक्ती कमी होत राहते. अशा प्रकारे टीका करणं आणि टीका ऐकणं या दोन्हीही गोष्टी आपली ऊर्जा कमी करतात.

सुरेश ओबेरॉय : एखाद्याची चूक लपवायची म्हणूनही कोणी टीका करायला नको.

शिवानीदीदी : बरोबर.पालकांना वाटतं की त्यांनी मुलांना शिकवावलंच पाहिजे. त्यांना अभिप्राय द्या पण आधी त्या व्यक्तीला त्या कृतीतून बाजूला काढा. आणि मग कृतीबद्दल बोला. आपण जेव्हा एखाद्या व्यक्तीवर हल्ला करू तेव्हा तिची ऊर्जा घटेल.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पिनू : आज चिकन आणलाय पण लिंबू नाही
झम्प्या : जाऊ दे न आता... नवीन विम बार लिक्वीड आलाय
त्यात १०० लिम्बांची शक्ती आहे तेच टाका दोन थेंब

## करूया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जर्मनीचे एकीकरण कोणी केले?

– बिस्मार्क

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'शब्द, भावना आणि...'

निरागस, निष्पाप चिमुकल्याचे बोबडे बोल आपल्याला मनापासून ऐकावेसे वाटतात. अक्षर, शब्द, वाक्य... हे शालेय जीवनात आपण प्रवेश केला की गिरवतो. अगदी एखादी वाक्य आपल्याला मनापासून आवडतं. ते वाक्य अर्थात शब्दांचा तो समुह आपल्या मनात घर करतं. निरागस बाळाच्या तोंडुन बाहेर पडणाऱ्या त्या शब्दांचं आपलेपण म्हणजेच आपली प्रेम भावना. ही ममत्वाची भावना, आपलं त्या बाळासोबत असलेलं घट्ट नातं लक्षात आणुन देते.

आजपर्यंत मी अनेक पुस्तकांचं वाचन केलं आहे, करतो आहे, ह्यापुढेही करणार आहे. गेल्या चाळीस वर्षांपासून मी लिहितो आहे. ह्यापुढेही मी लिहिणार आहेच. ह्यामुळेच शब्द, भावना ह्यांच्याशी माझं जवळचं नातं आहे असं म्हणता येईल. कधी कधी, शब्द कितीही सामर्थ्यवान असले तरी ते मनातल्या सर्वच भावना व्यक्त करतीलंच असं नाही. शब्दांचं सामर्थ्य प्रचंड आहे, असतं. आपण विचार करतो, वाचन करतो, लेखन करतो म्हणजे शब्दांच्या अधिकाधिक जवळ जातो, ते शब्द आपण, आपल्या आत घेतो. 'तू अर्ध्या रात्री मला हाक मार. मी नक्कीच तुझ्याकडे येईल.' दहा शब्दांचं हे वाक्य आहे. पण त्यातली भावना प्रचंड ऊर्जा देणारी, ममत्वाची, आपुलकीची आहे. भलेही ती व्यक्ती रक्तनात्याचीही नसेल तरी 'माणूस' म्हणून, ते शब्द आपल्याला ऊर्जा देणारे आहेत. आपल्या तोंडुन बाहेर पडणारे शब्द अमूल्य आहेत. काही बोलण्यापूर्वी दोनदा विचार करावा पण बोलुन विचार करु नका – हे वाक्य शब्द किती जपुन वापरावेत हे सांगणारं आहे. शब्द म्हणजेच तो एक विचार आहे, शब्द म्हणजेच भावना आहेत. एखाद्याच्या सहवासात आपण गेलो आणि ती व्यक्ती कमीत कमी आपल्याशी बोलली तरीसुध्दा ते शब्द थेट पोहोचतात, मनाला भिडतात कारण ती व्यक्ती ते बोलणं कमीत कमी शब्दांमध्ये पण मनापासून चांगली भावना ठेऊनच आपल्याशी बोलते. म्हणूनच ते बोलणं मनाला स्पर्श करतं, त्या शब्दांमागील भावना, आपलसं करते. म्हणजेच आपल्या मनात येणारे विचार हे सकारात्मक असतील तर आपलं बोलणं, त्या बोलण्यामागची भावनाही चांगली अर्थात सकारात्मक असेल. असंही ऐकलंच की मनात सकारात्मक विचार येणं जेवढं गरजेचं आहे तेवढंच गरजेचं आहे सकारात्मक कृती करणं. म्हणजेच शब्द, भावना आणि कृती हे परस्परांस पुरक असे आहेत. कृतीचं महत्व तर अनन्य साधारण आहे. फक्त ती कृती सकारात्मक हवीय.

म्हणजेचं आपल्या हातुन होणारी अर्थात आपल्याकडुन होणारी कृती सकारात्मक असेल तर आपल्यासह इतरांचंही चांगलं होतं. एखाद्यावर अनपेक्षित संकट येतं आणि आपण अगदी त्याचवेळी त्याला आधार दिला, अगदी त्याच्या खांद्यावर हात ठेवला तरी न बोलताही आपले शब्द, भावना त्याला पोहोचतात. ह्याठिकाणी फक्त कृती महत्वाची आहे. ही सकारात्मक कृती शब्द आणि भावना एकाचवेळी थेट पोहचवते. एखादी व्यक्ती फक्त चांगलं बोलत असेल तरी सुध्दा आपल्याला छान, प्रसन्न वाटतं. म्हणजेच तो फक्त चांगल्या शब्दांचा समुह नाहीय तर ती एक चांगली कृती आहे. त्या व्यक्तीनं आपल्याला योग्य वेळी दिलेला आधार आहे. 'साहित्य सहवास'च्या माध्यमातुन गेल्या बारा वर्षांहुन अधिक काळ मी, वाचकांसोबत लेख, लघुकथा अर्थात शब्दांच्या माध्यामातुन संवाद साधतो आहे.

हे शब्द लिहिण्यापूर्वी मला वाचन, निरिक्षण, मनन, चिंतन करावं लागतं. एखाद्या अथवा अनेक पात्राच्या भूमिकेत जावं लागतं. नेमका कोणता अर्थपूर्ण शब्द मी लिहावा हे माझं मन मला सुचवतं, त्या शब्दांमुळे वाचकाच्या मनात कोणत्या भावना निर्माण होतील हासुध्दा विचार करावा लागतो आणि सर्वात महत्वाचं म्हणजे 'साहित्य सहवास'च्या त्या लेख, लघुकथेमधुन मी नेमकं काय दिलं आहे हा प्रश्न मी स्वतःला विचारतो.

ही विचारण्याची कृती करण्यापूर्वीच मला विचार करावा लागतो. एखादा वाचक – चाहता फोन करुन मला अभिप्राय कळवतो त्यावेळी मला आनंद होतो, समाधान लाभतं. वाचक – चाहता अगदी भरभरुन बोलतो त्यावेळी त्याच्या मनाचा, भावनेचा मी नेहमीच स्वीकार करतो, आदर करतो. तुमच्याकडुन अभिप्रायरुपात होणारी कृती, मला प्रेरणादायी, आनंददायी आहे. मी आणि वाचक ह्यांच्यामध्ये दै.नवा मराठा परिवार, ललितजी गुंदेचा आणि कुटुंबिय माझ्या सोबत आहेत हा प्रचंड मोठा आधार आहे. माझे विचार, वाचकांपर्यंत पोहचवण्यासाठी नवा मराठा परिवार वर्षानुवर्षे सकारात्मक कृती करत आहे हे अत्यंत महत्वाचं आहे. वाचकहो, काळजी करु नका पण स्वतःची, कुटुंबाची काळजी घ्या. मस्त राहा. सकारात्मक विचार करतांनाच, सकारात्मक कृतीही करुया, जगणं समृध्द करुया.

(लेख क्र.६१७)

**– सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

मातेपेक्षा श्रेष्ठ असे कोणतेही दैवत सृष्टीमध्ये नाही. सुभाषितांमध्ये म्हटले आहे की, माता ही स्वर्गापेक्षाही महान असते. मातेला महान समजण्याचे कारण असे आहे की, तिच्यामुळे वंश वाढविला जातो. माता ही आपल्या स्वतःच्या शरीराची नऊ महिने झीज करून, स्वतःच्या जीवाची पर्वा न करता बालकाला जन्म देते. बालकाला देखील पुढील आयुष्य घडविण्यासाठी मातेचे संस्कार उपयोगी पडतात.

### गर्भसंस्कार केंद्राचे प्रयोजन

जसे शिवाजी महाराजांना घडविण्यात जिजाऊंचा हात आहे.

तसेच आताच्या काळातील बालक आरोग्य संपन्न, समंजस, तेजस्वी, उत्साही व बुद्धिमान होण्यासाठी मातेचा सहभाग अतिशय महत्त्वाचा असतो; म्हणून गर्भावस्थेत तिचे शारीरिक व मानसिक बल वाढविण्यासाठी, तिच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आयुर्वेदिक दुर्वांकुर 'गर्भसंस्कार केंद्र' सुरू केले आहे.स्त्रीला सर्वांत जास्त आनंद केव्हा होतो? तर ती जेव्हा आई होणार असते तेव्हा. स्त्रीला सर्वांत जास्त प्रिय व्यक्ती हे तिचे स्वत:चे बाळ असते व बाळाला देखील सर्वांत आवडती व्यक्ती ही त्याची आई असते. म्हणूनच तर जन्मानंतर बाळ आईच्या मांडीवर दिव्याबरोबर रडता-रडता थांबते.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-म्हाळुंगे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# शहर आणि सभासदांच्या हिताचे कार्य करा

## आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; काका ट्रस्टतर्फे नूतन एसा संचालक मंडळाचा सन्मान



आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगरच्या नूतन कार्यकारिणीची नुकतीच निवड झाली असून, या संपूर्ण नूतन संचालक मंडळाचा काका ट्रस्टच्यावतीने आयोजित गुणगौरव सोहळ्यात सन्मान करण्यात आला. याप्रसंगी आमदार संग्राम जगताप आणि आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप व प्रा माणिक विधाते आदी.

नगर – आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगरच्या नूतन कार्यकारिणीची नुकतीच निवड झाली असून, या संपूर्ण नूतन संचालक मंडळाचा काका ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित गुणगौरव सोहळ्यात सन्मान करण्यात आला. आमदार संग्राम जगताप आणि आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप व प्रा माणिक विधाते यांच्या हस्ते एसा संस्थेचे अध्यक्ष प्रदीप तांदळे, उपाध्यक्ष सुनिल औटी, सचिव भूषण पांडव, खजिनदार संतोष खांडेकर, सहसचिव अनमोल जैन तसेच संचालक अन्वर शेख, सुनिल जाधव, सचिन डागा, संकेत पादीर, गौरव मांडगे, सागर ढगे, विजय उजनीमठ, अमेय कुलकर्णी आणि आदिनाथ आंबेकर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना आ. संग्राम जगताप म्हणाले की, सन्मान हा केवळ निवडीबद्दल असतो असे नाही, तर त्याचबरोबर आगामी काळात अधिक चांगले काम करण्याची जबाबदारीही आपल्यावर टाकत असतो. शहराच्या सौंदर्यात भर घालण्याचे काम आर्किटेक्ट करत असतात, तर सशक्त, सक्षम आणि नियोजनबद्ध बांधकाम करण्याचे काम इंजिनीअर्स करतात. एसा संस्था या दोन्ही क्षेत्रांमध्ये उत्तम काम करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

एसा संस्था मागील चाळीस वर्षांपासून शहरात कार्यरत असून, शहराच्या विकासामध्ये संस्थेचा मोठा सहभाग आहे. सभासदांचे प्रश्न सोडविताना विविध तांत्रिक तसेच सामाजिक उपक्रम संस्थेच्या माध्यमातून सातत्याने राबविले जातात. नियमावलीमध्ये होणारे बदल तसेच नवीन तंत्रज्ञानाची माहिती सभासदांना व्हावी, यासाठी विविध सेमिनारचे आयोजन केले जाते. त्यामुळे शहराच्या जडणघडणीत एसा संस्थेचा चांगला सहभाग असल्याचे आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले.

नवनियुक्त कार्यकारिणीचे अभिनंदन करून आमदार संग्राम जगताप यांनी त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. आगामी काळात नवनियुक्त संचालक मंडळाने उत्तम कार्य करताना शहर आणि सभासदांच्या हिताचा विचार करून कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

एसा संस्थेचे अध्यक्ष प्रदीप तांदळे यांनी काका ट्रस्ट तसेच आमदार संग्राम जगताप आणि सचिन जगताप यांचे आभार मानले. आगामी वर्षात संस्थेच्या माध्यमातून विविध तांत्रिक आणि सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार संग्राम जगताप हे नेहमीच संस्थेच्या पाठीशी राहिले असून, संस्थेसमोरील विविध अडचणी सोडविण्यासाठी ते सहकार्याच्या भूमिकेत असतात, असे प्रदीप तांदळे यांनी नमूद केले. संस्थेच्या एसा भवन या इमारतीच्या उभारणीमध्येही आमदार संग्राम जगताप यांची चांगली मदत झाली आहे. तसेच एसा भवन परिसरात ओपन स्पेस निर्माण करण्याच्या कार्यात त्यांनी सिंहाचा वाटा उचलल्याचेही त्यांनी सांगितले.

एसा संस्थेचे उपाध्यक्ष सुनिल औटी यांनी वर्षभरात शहर विकासासाठी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये संस्थेकडून आवश्यक त्या तांत्रिक बाबींसाठी मदत करण्याचे आश्वासन दिले.

आज झालेला हा सन्मान आम्हाला आगामी संपूर्ण वर्षभर चांगले काम करण्यासाठी प्रेरणा देणारा आहे. संस्थेच्या माध्यमातून शहर विकास, सभासदांचे हित तसेच सामाजिक आणि तांत्रिक क्षेत्रात अधिक प्रभावीपणे काम करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे सुनिल औटी यांनी सांगितले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## विवेकाअभावी दयनीय अवस्था







माणसाचा स्वभाव सात्विक, राजस आणि तामसी असा तीन प्रकारचा असतो. सात्विक स्वभावामुळे सुख लाभते. राजस स्वभाव कार्यप्रवण करतो. पण ताम सी स्वभाव मात्र, केवळ आळस व त्यामुळे दवडणारी संधी व घडणारे प्रमाद यांचेच कारण ठरतो. स्वभावाच्या या तिन्ही शैली माणसात उपजत असतात. कोणीही शैली वाढवायची आणि कोणती वर उफाळू द्यायची नाही, याचा विवेक माणसाने केला पाहिजे. या शैली सत्व, रज व तम या तीन गुणांचा परिपाक होत.

रजोगुण कृतिप्रवण करणारा असला, तरी ही कृती सत्वगुणाच्या प्राबल्याने घडली पाहिजे. केवळ रजोगुणच खूप उफाळला. तर ही कृती हावरटपणा, लोभी वृत्ती व अर्थामागे लागलेली, स्वार्थी प्रवृत्ती यांनाच पुढे रेटते.

तामसी प्रवृत्ती तर अत्यंत वाईट, पण रजोगुणानेदेखील माणसाचे कार्य योग्य प्रकारे घडत नाही.

रजोगुणामुळे स्वार्थ बोकाळतो. डोक्यावर धुंदी चढते आणि चांगल्या शिकल्यासवरल्यांचेही पाउल वाकडे पडते. मग त्यांची फजिती होते. सत्वगुणाचे वळण न ठेवले, तर रजोगुण तामसी प्रवृत्तीला प्रचलित करतो. मग तमोगुण म्हणजे साक्षात दुर्गुणः तो बोकाळतो. बुद्धीला, पदाला व अधिकाराला न शोभणारी विचारशैली तो कृतीत उतरवितो. केविलवाण्या व दयनीय अवस्थेत लोटतो. त्यापायी ओढवलेला प्रसंग कधी कधी प्राणावर बेततो.

एका वजिराला सत्ता आणि संपत्ती याचा माज आला. रजोगुण आणि तमोगुण बेफाम झाला. सात्विक प्रवृत्तीचा त्याला साहिजकच राग येउ लागला. एका सात्विक संताला लोक खूप मान देत. कधी कधी वजिरापेक्षाही त्याला अधिक मान मिळे. वजिराला त्या संताचा राग आला. त्याला त्याने एका अपराधात गोवले. बादशहापुढे उभे केले. बादशहाने वजिराचे म्हणणे ऐकून त्या संताला फाशी द्यायचे फर्मान काढले. संत मुळीही डगमगला नाही. तो म्हणाला, मी न केलेल्या अपराधाबद्दल मला सजा होतेय. उद्या अल्लाच्या निर्णयाच्या वेळी अल्ला तुला माफ करणार नाही. तुला तो भयानक दंड दिल्याशिवाय राहणार नाही. पण म्हणून तू मला प्राणदंडाची शिक्षा माफ करावी, अशी असे मी म्हणणार नाही. हे बादशहा, उद्या आल्लानं तुला भयानक दंड देउ नये, म्हणून मला तु दिलेली शिक्षा योगयच होती हे ठरलं पाहिजे. आणि तेवढ्याचसाठी मी या वजिराचाच खून करतोय.'

संत कट्यार घेउन वजिरावर धावला. वजिर जिवाच्या भीतीने ओरडला. बादशहा सलामत, मी चुकलो, हा संत निरपराध आहे. केवळ दुष्टपणापायी मी त्याला अपराधात गोवलं आहे.

– **किशोर गांधी**

# वंचितांच्या जगण्याला 'स्नेह' देणाऱ्या डॉ. उद्धव शिंदेंचा सन्मान



समाजकार्यातील अखंड सेवेबद्दल स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा गौरव करताना अहिल्यानगरचे अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे.

नगर – समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचवून निस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या 'स्नेहबंध सोशल फौंडेशन'च्या कार्यावर खाकीने कौतुकाची मोहर उमटवली आहे. फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या बहुआयामी समाजकार्याची दखल घेत अहिल्यानगरचे अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. शाल, पुस्तक आणि पुष्पगुच्छ देऊन कलुबर्मे यांनी डॉ. शिंदे यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले.

डॉ. उद्धव शिंदे यांनी 'स्नेहबंध'च्या माध्यमातून समाजकार्याला एका इव्हेंटपुरते मर्यादित न ठेवता सातत्यपूर्ण चळवळीचे रूप दिले आहे. रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून रुग्णांचे प्राण वाचवणे, वंचित पाल्यांच्या शिक्षणाला बळ देणे, आरोग्य तपासणी, वृक्षारोपण व त्यांचे संवर्धन, तसेच महिला व तरुणांना स्वावलंबी बनवण्यासाठी प्रबोधनपर उपक्रम राबवण्यात संस्था नेहमीच आघाडीवर राहिली आहे. याच निःस्वार्थ कार्याचा गौरव पोलीस प्रशासनाकडून करण्यात आला. कोणत्याही प्रसिद्धीच्या अपेक्षेशिवाय तळमळीने काम करत राहणे हीच खरी सेवा आहे. खाकी वर्दीकडून मिळालेली ही दाद केवळ माझा नाही, तर स्नेहबंधच्या संपूर्ण टीमच्या घामाचा सन्मान आहे. यामुळे वंचितांच्या सेवेसाठी काम करण्याची आमची जबाबदारी आणि ऊर्जा दोन्ही अधिक वाढले आहेत, असे स्नेहबंधचे डॉ. उद्धव शिंदे म्हणाले.

# नागोरी मुस्लिम मिसगर जमात ट्रस्टच्या शाळा-कॉलेज मधील शिक्षक भरतीच्या चौकशीची मागणी



नगर – मौलाना आझाद रोड येथील नागोरी मुस्लिम मिसगर जमात ट्रस्टच्या अहमदनगर उर्दू प्राथमिक शाळा, अहमदनगर उर्दू हायस्कूल व मिसगर ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थी संख्या नसतानाही शिक्षक भरती करून शासनाच्या अनुदानाचा गैरवापर होत असल्याचा आरोप इम्रान शफी अहमद शेख यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून बेकायदेशीर शिक्षक भरती रद्द करावी तसेच संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी महाराष्ट्र अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांच्या अहिल्यानगर दौऱ्यादरम्यान निवेदनाद्वारे केली.

निवेदनात म्हटले आहे की, इतर ठिकाणी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे या शाळा व महाविद्यालयात बोगस प्रवेश दाखवून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेतला जात असल्याचा आरोप आहे. विद्यार्थ्यांचे आहार, शिक्षण, आरोग्य, आरोग्य शिक्षिका, मुख्याध्यापक डायरी, लिपिक, देणगी, शालेय फंड, दप्तर, पुस्तके, शैक्षणिक साहित्य, वह्या, गणवेश तसेच विविध कोटेशनच्या माध्यमातून शासनाच्या निधीचा गैरवापर होत असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

या संदर्भात गेल्या दहा वर्षांपासून अहिल्यानगर येथील शिक्षणाधिकाऱ्यांकडे वेळोवेळी तक्रारी व अर्ज करूनही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. तसेच शासनाच्या शिक्षक भरतीच्या नियमांचा भंग करून आर्थिक लाभासाठी शिक्षक व शिक्षिका भरती प्रक्रिया राबविण्यात आल्याचा दावा निवेदनात करण्यात आला असून, या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याचा आरोप करत त्याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सदर शाळा व महाविद्यालयातील शिक्षक भरती तात्काळ रद्द करावी, संस्थेचे स्वघोषित संचालक व संबंधित मुख्याध्यापक यांच्या भूमिकेची चौकशी करावी, भरती प्रक्रियेत झालेल्या आर्थिक व्यवहारांची तपासणी करून दोषींवर कारवाई करावी तसेच संस्थेवर प्रशासक नेमावा, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

दरम्यान या मागण्यांवर शासनाने तातडीने कार्यवाही करून प्रकरणाची चौकशी करावी, त्यामुळे प्रशासन या तक्रारीवर काय भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे आणि शिक्षण क्षेत्रातील गैरप्रकारांना आळा बसावा, यासाठी शासनाने या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# चिमुकल्या हातांनी घडला बाप्पा, सर्जनशीलतेचा उमटला ठसा

## सेंट विवेकानंद इंग्लिश प्रायमरी स्कूलमध्ये गणपती बनवा कार्यशाळा उत्साहात



सेंट विवेकानंद इंग्लिश प्रायमरी स्कूलमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने 'गणपती बनवा कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या चिमुकल्या हातांनी मातीपासून सुंदर गणेशमूर्ती साकारल्या.

नगर – सेंट विवेकानंद इंग्लिश प्रायमरी स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळावी तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने 'गणपती बनवा कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या चिमुकल्या हातांनी मातीपासून सुंदर गणेशमूर्ती साकारल्या.

हा उपक्रम प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

मुख्याध्यापिका म्हणाल्या की, एनईपी २०२० चे उद्दिष्ट शिक्षणाला घोकंपट्टीतून सर्वांगीण, अनुभवात्मक आणि क्षमता-आधारित शिक्षणात रूपांतरित करून, ज्ञानी, कुशल, नैतिक आणि जबाबदार नागरिकांची जोपासना करणे आहे. अभ्यासासोबतच, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाचाही विचार करण्यात आला आहे.

चित्रकला शिक्षिका अनामिका म्हस्के व क्रीडा शिक्षिका सौ. नयन तुपे यांनी कार्यशाळेच्या आयोजनात मोलाची भूमिका बजावत विद्यार्थ्यांना आवश्यक सहकार्य व मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी शिल्पकलाकार प्रेरणा बागरेचा यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

शिल्पकलाकार प्रेरणा बागरेचा यांनी विद्यार्थ्यांना मातीपासून गणेशमूर्ती घडविण्याची प्रक्रिया प्रात्यक्षिकासह समजावून सांगितली. मातीला योग्य आकार देणे, मूर्तीची रचना करणे तसेच कलात्मक बारकावे याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही अत्यंत उत्साहाने सहभाग घेत आपल्या कल्पकतेतून विविध सुंदर गणेशमूर्ती साकारल्या. 'कलेतून संस्कार आणि संस्कारातून पर्यावरण संवर्धन' असा सुंदर संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी व हरेष मध्यान, तसेच माध्यमिक विभागाच्या प्राचार्या सौ. गीता तांबे आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांनी कौतुक केले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद, हातातील माती आणि त्यातून साकारलेला बाप्पा यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय व कलामय झाले.

# राधाबाई काळे महिला महाविद्यालयात श्रावणी काव्यसंमेलन



राधाबाई काळे महिला महाविद्यालयात मराठी विभागातर्फे श्रावणी काव्यसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – श्रावण महिन्याचे औचित्य साधून राधाबाई काळे महिला महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने श्रावणी काव्यसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीप प्रज्वलन करून श्रावणी काव्य संमेलनास सुरुवात करण्यात आली. या संमेलनात विद्यार्थिनींनी विविध विषयांवरील कवितांचे वाचन व गायन करून कार्यक्रमाचा आनंद द्विगुणीत केला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर थोपटे यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भूपेंद्र निकाळजे होते. महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ.सचिन कोतकर यांनी आपल्या प्रास्ताविकात श्रावणी काव्य संमेलन आयोजनामागील हेतू व श्रावणी काव्य संमेलनाचे स्वरूप स्पष्ट करताना कविता हे सामजिक वास्तवाचे जाणीव करून देणारे प्रभावी माध्यम आहे हे उदाहरणातून दाखवून दिले. निसर्ग, स्त्रीजीवन, नातेसंबंध आणि सामाजिक जाणिवा अशा विविध विषयांवरील स्वरचित कविता तसेच मराठीतील सुप्रसिद्ध कवींच्या कविताही या संमेलनात सादर झाल्या. तर गायनाच्या सादरीकरणाने वातावरणात श्रावणसरींचा गंध भरला. विद्यार्थिनींबरोबरच प्रा.डॉ. सतीश सायकर, प्रा. विष्णू अडसरे, डॉ. शुभांगी दांगट व प्रा. गीतांजली खाडे या प्राध्यापकांनीही कविता सादर केल्याने संमेलनाची रंगत अधिकच वाढत गेली.विद्यार्थिनींनी कविता आणि साहित्याच्या माध्यमातून समाजाकडे संवेदनशीलपणे पहावे तसेच वाचन आणि लेखनाची आवड जोपासावी असे प्रतिपादन डॉ. भूपेंद्र निकाळजे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून केले.याप्रसंगी डॉ. गणेश विधाटे, व प्रा.अभिषेक होळकर तसेच महाविद्यालयातील विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मराठी विभागातील कु. प्रांजल राऊत, कु.प्रिती चक्रनारायण, कु.सायली लवांडे, कु. प्रतिक्षा परभणे या विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन कु.योगिता गायकवाड हिने केले, तर कु. दीक्षा गायकवाड हिने आभार मानले.

# सीरतुन्नबी क्विझ कॉम्पटीशनचे १३ सप्टेंबर रोजी आयोजन




नगर – मुलांच्या शैक्षणिक पात्रतांना वाव देऊन त्यांच्यात इस्लामी ज्ञानाची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने अंजुमन ए जमीयतुल कुरेश व आला हजरत ताजुल फहुल अकॅडमी नगर शाखेच्यावतीने वतीने 'सीरतुन्नबी क्विझ कॉम्पटीशन'चे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा १३ सप्टेंबर रोजी बेपारी मोहल्ला येथील ४ नंबर स्कूल येथे आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेची सुरुवात दुपारी २ वाजता होणार असून, स्पर्धा रात्रीपर्यंत चालणार आहे.

स्पर्धेत विद्यार्थ्यांसाठी विविध गटांमध्ये प्रश्नमंजुषा घेण्यात येणार असून, विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. पहिल्या गटासाठी १२ हजार रुपये, दुसऱ्या गटासाठी ८ हजार रुपये, तिसऱ्या गटासाठी ५ हजार रुपये आणि चौथ्या गटासाठी ३ हजार रुपये अशी पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. तसेच सहभागी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात येणार आहेत.

या क्विझ स्पर्धेत इस्लामी ज्ञान, इतिहास, धार्मिक माहिती, सामान्य ज्ञान व सांस्कृतिक मूल्ये यासंबंधी विविध प्रश्नांचा समावेश असणार आहे. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी, त्यांचा आत्म विश्वास वाढावा तसेच शैक्षणिक क्षमता विकसित व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

या स्पर्धेत विद्यार्थी, पालक तसेच समाजातील नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमासाठी निरीक्षक व समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती

नगर – विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांची मतदार यादी निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

नागरिकांना या संदर्भात आवश्यक माहिती अथवा अडचणींबाबत संपर्क साधता यावा यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४६२४०१, विस्तार क्र. ३३५ असा आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी श्री. गावंडे, सहआयुक्त (पुनर्वसन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# पसायदानासम वैश्विक संकल्पना 'क्षमापना'



सर्वात जुन्या व सक्षम तत्त्व, पायावर उभ्या संस्कृती म्हणजे हिंदू, बौद्ध आणि जैन. असंख्य आक्रमणे, अडचणी व दुर्लक्षित परिस्थितीतही या तत्त्वप्रणाली टिकून आहेत, उज्ज्वल राहतील.

प्रत्येक नदीप्रमाणे प्रत्येक धार्मिक तत्त्वे, धारणा मूळच्या स्वच्छ, सुंदर, प्रवाही असतात. पण काही नद्या अधिक महत्त्वाच्या मानल्या जातात तद्वतच हजारो वर्षांच्या परंपरा लाभलेली जैन परंपरा म्हणूनच विलक्षण लक्षणीय ठरते. एकच उदाहरण समजून घेऊ या. भगवान महावीरांच्या महानिर्वाणाला २५०० हून अधिक वर्ष होऊन गेली मग प्रथम तीर्थंकर भगवान ऋषभदेवांचा कार्यकाळ किती जुना असेल.

अशा या जैन धर्माचा पाया अहिंसेवर रचला गेला आहे. प्रत्येक जीवात आत्मा असून सर्वांनाच जगण्याचा अधिकार आहे. केवळ मानवच नाही तर प्रत्येक सजीव, निर्जिव प्राणीमात्राप्रती करुणाभाव ठेवून त्यांच्या प्रती कळत नकळत झालेल्या, केलेल्या चुका, दोष, अपराधांसाठी अंतरिक भावभावनांनी क्षमा मागणारा क्षमापना उत्सव हा जैनीयांचा सर्वोत्तम सण आहे. उत्सव आहे.

सध्या आपल्या शहरात भव्य चार्तुमास होत आहे. हजारो अठाया, मासखमण इ. तपसाधनेने वातावरण आनंदमय झाले असून बऱ्याच वर्षांनी धर्मप्रभावना अजून वाढली आहे. मागील दोन दशकांपासून विशेष प्रयत्नातून धर्म जागरण करणारे उपाध्याय पू. श्री. प्रवीणऋषीजी म.सा. हे आपल्या विविध योजनांतून धर्मप्रचार प्रसाराचे मोठे योगदान देत आहे. त्यांच्या प्रवचनातून पर्युषण पर्वाबद्दल अधिक माहिती मिळते. एका युगात तब्बल ६३ हजार वर्षांचा महादुष्काळ पडला होता. अत्यंत हालाखीची परिस्थिती होती. पण सलग ७ दिवस असे ४ वेळा पाऊस झाल्याने पुन्हा एकदा पृथ्वी माता बहरुन आली. तो दिवस म्हणजे पर्युषण पर्वाचा सर्वोच्च दिन म्हणजे 'संवत्सरी'. या दिवशी पुन्हा एकदा नंदनवन फुलले. या अर्थाने हा नववर्ष दिन आहे. तीर्थंकरांच्या पुण्याईने येथून पुनश्च आनंदाचा श्रीगणेशा झाला. म्हणून हा एक उत्सवाचा काळ. यात आनंदाची अनुभूती घेतानाच दुसऱ्यांच्याही आनंदात सहभागी होण्याची उत्सवी, धार्मिक व आत्मसंयमी वृत्ती असते. यात कृतज्ञता व क्षमा मागण्याचीही प्रामाणिक वृत्ती असते.

पर्युषण पर्वात स्वत:त पाहणे, आत्मजागृती व आत्मशुद्धी यासाठी विशेष प्रयत्न केला जातो. त्यासाठी संयम व पंचेंद्रियांचा निग्रह करुन उपवास केले जातात आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे भूतकालीन गतवर्षात केलेल्या चुका, दोष, अपराधांसाठी प्रामाणिकपणे सार्वजनिक सांवत्सरिक क्षमापना दिली, घेतली जाते.

यानिमित्ताने एक वैशिष्ट्य म्हणून जैनियांकडे पाहिले पाहिजे ते व्यवसाय, उद्योगात कुशल तर आहेतच पण वैयक्तिक धार्मिक प्रगतीसह गुणदोषांची कमतरताही स्विकारतात. पहा ना आर्थिक नफा तोटा पत्रक व बॅलन्सशीट प्रमाणे ते या पर्युषण पर्वात आत्म उद्धारासाठी हिशोब मांडण्याचा प्रयत्न करतात. दैनंदिन जीवनात, व्यवसाय करताना केलेल्या, झालेल्या त्रुटी, अपराध, मनमुटाव आणि द्वेष, राग, क्रोधासाठी ते क्षमा मागतात. ही किती मोठी, व्यापक संकल्पना आहे! म्हणूनच मला ही क्षमेची भावना माऊली ज्ञानेश्वर यांच्या पसायदानाप्रमाणे भव्य, व्यापक व वैश्विक वाटते. ज्ञानेश्वर माऊलींनी जो जे वांच्छिल तो ते लाभो सांगत सर्वांच्या व विश्वकल्याणासाठी प्रार्थना केली. तर क्षमापनेत समोरच्याची माफी मागताना उदारता मागत, दाखवत क्षमायाचना केली जाते. आजच्या 'आरे ला कारे' वातावरणा प्रचंड राग, मत्सर व युद्धजन्य परिस्थितीत क्षमेचे महत्त्व अधिकच गरजेची आणि महत्त्वपूर्ण ठरते. प्रदूषित शारिरिक, बौद्धिक, सामाजिक भोवतालात परस्पर दयाभाव अत्यावश्यक ठरते आहे. तसं तर सहजच कुणाची माफी मागणे सोपे नसते. म्हणूनच या क्षमापनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पर्युषण पर्वात अध्यात्म, आत्मशुद्धीची साधना मानवीय अंतीम उद्दिष्ट मानलेल्या मोक्षापर्यंत घेऊन जाते. क्षमा करणे व मागणे हे शुराचे लक्षण आहे अर्थात यात प्रामाणिकपणा असणे गरजेचेच! केवळ कौटुंबिक, सामाजिक परंपरा पाळावी म्हणून क्षमायाचना नसावी.

माझ्याही गतकालीन बँकींग, सामाजिक व इतर विविध क्षेत्रात अनेक जण दुखावले गेले आहेत. त्यात खरं बोलणं व्यावहारिकदृष्ट्या चुकीचे मानतात. खोटं पण गोड बोलणे, लोकांना आवडते असो. आमच्या जैनियांच्या पावनपवित्र पर्युषण पर्वात आपणा सर्वांच्या मनमुटावसाठी मन, वचन, कायाद्वारा त्रिवार व जाहीर क्षमायाचना करीत आहे त्याचप्रमाणे विघ्नहर्त्या गणरायाच्या गणेशोत्सवानिमित्त हार्दिक मंगल शुभेच्छा!

– **किशोर गांधी** (दिशान फिचर्स)

# मनोहरलाल रामचंद सबलोक प्राथमिक विद्यालयात पर्यावरणपूरक शाडू मातीगणपती कार्यशाळा उत्साहात

नगर – मनोहरलाल रामचंद सबलोक प्राथमिक विद्यालयात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देत शाडू मातीची गणपती मूर्ती बनवण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या सलग दहा वर्षांपासून ही कार्यशाळा नियमितपणे राबवली जात असून, या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने बाप्पाची मूर्ती साकारण्याचे कौशल्य आत्मसात केले आहे.


मनोहरलाल रामचंद सबलोक प्राथमिक विद्यालयात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देत शाडू मातीची गणपती मूर्ती बनवण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

शाडू मातीचा वापर करून आकर्षक, विनाशासक आणि पूर्णपणे पर्यावरणपूरक मूर्ती तयार करण्यावर या उपक्रमात विशेष भर दिला जातो. रासायनिक रंगांऐवजी व प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी नैसर्गिक मातीचा वापर करून बाप्पा कसा साकारायचा, याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उपजत कलागुण, सर्जनशीलता, स्वावलंबन आणि बालवयापासूनच पर्यावरण संवर्धनाची जाणीव विकसित होत आहे. गणपती उत्सव आनंदात साजरा करताना निसर्गाचा समतोल कसा राखला जावा, हा महत्त्वपूर्ण संदेश या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला जातो. गेल्या दहा वर्षांच्या या प्रवासात हजारो विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सहभाग घेऊन स्वतः मूर्ती बनवण्याचे शिक्षण घेतले आहे. त्यामुळे ही कार्यशाळा केवळ मूर्ती तयार करण्यापुरती मर्यादित न राहता भारतीय परंपरा, कला आणि पर्यावरण रक्षण यांचा एक सुंदर संगम घडवणारा दीपस्तंभ ठरली आहे.

या उपक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. नराल मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. कार्यशाळेचे प्रात्यक्षिक व प्रभावी सादरीकरण सौ. उकिरडे मॅडम यांनी केले. या उपक्रमात विद्यालयातील शिक्षक–शिक्षिका वृंद आणि विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत सुंदर आणि देखण्या गणपती मूर्ती तयार केल्या.

# शालेय विद्यार्थ्यांसाठी १९ सप्टेंबरला 'जिल्हास्तरीय सायकलिंग स्पर्धा'

नगर – सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने अहिल्यानगर जिल्हा सायकलिंग असोसिएशन यांच्या वतीने दिवंगत कु. शिवानी लाला कांबळे यांच्या स्मरणार्थ शालेय जिल्हास्तरीय सायकलिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १९ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता आयोजित करण्यात आली असून, जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या स्पर्धेची सुरुवात पारिजात चौक, गुलमोहर रोड, सावेडी येथून होणार आहे.

स्पर्धेत १० वर्षेसाठी २ किमी, १२ वर्षेसाठी ३ किमी, १४ वर्षेसाठी ४ किमी, १६ वर्षे साठी ५ किमी आणि १८ वर्षेसाठी ६ किमी अशा वयोगटांमध्ये मुला–मुलींसाठी स्वतंत्र स्पर्धा घेण्यात येणार आहे. वयोगटानुसार सायकलिंगचे अंतर निश्चित करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक गटातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पहिल्या तीन क्रमांकांसाठी रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत.

शालेय विद्यार्थ्यांना सायकलिंग या खेळाची ओळख व्हावी, त्यांच्यामध्ये शारीरिक तंदुरुस्ती, आत्मविश्वास, स्पर्धात्मक वृत्ती आणि निरोगी जीवनशैलीची जडणघडण व्हावी, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे केवळ नियमित सायकलपटूंनीच नव्हे, तर सायकल चालविण्याची आवड असलेल्या सर्व शालेय विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आयोजकांनी सांगितले. अधिक माहितीसाठी प्रा.संजय साठे –मो.नं.७९७२१८९६७०, प्रा. साईनाथ थोरात ७४१००१८१००. या शालेय सायकल स्पर्धेसाठी शैलेश गवळी, विनायक भुतकर, मुख्य प्रायोजक लाला कांबळे परीश्रम करीत आहेत.


सावेडी जेष्ठ नागरिक मंचच्या वतीने आयोजित 'नैवेद्य समर्पण' संगीत नृत्यमय कार्यक्रमातील कलाकार.

# सावेडी जेष्ठ नागरिक मंचच्या वतीने आयोजित 'नैवेद्य समर्पण' संगीत नृत्यमय कार्यक्रम रंगला

नगर – ओम संगीत विद्यालया तर्फे नमोजी आद्या, देव देव्हाऱ्यात नाही, क्षणभर उघडी नयन देवा, अबिर गुलाल, निजरूप दाखवावे, माता आई तुळजा आई, जेजुरीचा खंडोबा या संगीत नृत्यमय कार्यक्रमाचा रंगला अनोखा संगम. निमित्त होते सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्या वतीने आयोजित 'नैवेद्य समर्पण' या संगीत नृत्यमय कार्यक्रमाचा.

ज्येष्ठ नागरिक मंच सावेडी च्या सभागृहात रंगलेल्या या संगीत मैफिलीत ओम संगीत विद्यालयाचे श्री रवींद्र उल्हारे, अनंत द्रविड व सह कलाकारांनी विविध अभंग, गौळण, भारुड गीते सादर केली.

यावेळी मंचचे अध्यक्ष शरद कुलकर्णी, बलभीम पांडव, न्या. चारू डोंगरे, एस. आर. जोशी, श्रीकांत नाईक, सुनंदा कुलकर्णी, कुमुदिनी बोपर्डीकर, केळकर ताई, खणकर सर, बाजीराव जाधव, स्नेहल वेलणकर, मोरेश्वर मुळे, शुभदा जागीरदार, चारुशीला करवंदे, ज्योती केसकर उपस्थित होते.

गणेश पूजनाने मैफिलीचा प्रारंभ झाला. दुसऱ्या सत्रात 'तराना' या गायन प्रकारावर अनंत द्रविड यांनी मनमोहक असे नृत्य सादर केले. त्यानंतर जात्याच्या ओव्या, दादला नको ग बाई, हे भारुड सादर केले गेले. त्यांना साथ संगत करणारे दिलीप काकडे, धनाजी पांचाळ, विशाल आढागळे, तसेच सिंथेसायझर वर होते शलमुन पहिलवान यांनी साथ केली. मयूर नृत्य करणारे अनंत द्रविड यांनी झाडे लावा झाडे जगवा, साक्षरता, राष्ट्रप्रेम, स्वच्छता, स्वालंबन, नात्यांमधील घट्ट वीण, आई–वडिलांचे महत्त्व यावर प्रबोधन केले. 'चुकले तुझे बाळ आई' या भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली.

सर्व कलाकारांचा यथोचित सत्कार अध्यक्ष शरद कुलकर्णी यांनी केला. कलाकारांचा परिचय पुष्पा चितांबर, कार्यक्रमाचे सूत्रसंचलन हरिश्चंद्र थिगळे यांनी केले तर आभार पुष्पाताई कोरे यांनी मानले.

# ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**१४ सप्टेंबरला जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते 'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापणा**

नगर – शहराचे ग्रामदैवत असलेल्या माळीवाडा येथील श्री विशाल गणेश मंदिर येथे गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री गणेश चतुर्थी दिनी १४ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वा. मंदिरात जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते 'श्रीं'ची विधीवतपणे प्राणप्रतिष्ठापणा होईल. याचबरोबर १२ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष ॲड.अभय आगरकर यांनी दिली.


ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरातील अभिषेक हॉलचे काम अंतीम टप्प्यात आले आहे.

१४ सप्टेंबर रोजी पहाटे महापुजा, प्राणप्रतिष्ठेच्यावेळी सकाळी ९ वा. 'रुद्रवंश' ढोल पथकाची मानवंदना दिली जाईल. २० सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वा महिलांचे सामुहिक अथर्वशीर्ष पठण व महाआरती होईल. २२ ते २४ सप्टेंबरपर्यंत वैभव अजय बोरुडे परिवाराच्यावतीने श्री गणेशयाग होणार आहे. त्याचे पौरोहित्य नाशिक येथील मुकुंदशास्त्री मुळे गुरुजी करणार आहेत. तसेच १४ ते १९ सप्टेंबर पर्यंत अहिल्यानगर शहरातील विविध ढोलपथक आपली वादन कला श्री विशाल गणेश मंदिर प्रांगण येथे सादर करणार आहेत. तसेच शहरातील विविध भजनी मंडळ आपला भजनसंध्या कार्यक्रम सादर करणार आहेत. २५ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन दिनी सकाळी ८.३० वा. जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्या हस्ते सपत्निक उत्थापन पुजा करण्यात येऊन मिरवणुकीस प्रारंभ करण्यात येईल. या मिरवणुकीमध्ये सुरुवातीस सनई चौघडा, युगंधर व रुद्रनाद हे दोन ढोलपथक वादन करणार आहेत. गणेशोत्सवानिमित्त १२ दिवसात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.



भविकांच्या सोयी–सुविधांसाठी मंडप, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच यावेळी अभिषेक हॉलचे काम सुद्धा अंतिम टप्पात असल्याचेही ॲड.आगरकर यांनी सांगितले.

गणेशोत्सव यशस्वीतेसाठी देवस्थानचे महंत संगमनाथ महाराज, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, रंगनाथ फुलसौंदर, बापुसाहेब एकाडे, चंद्रकांत फुलारी, विजय कोथिंबिरे, हरीचंद्र गिरमे, ज्ञानेश्वर रासकर, प्रा.माणिक विधाते, संजय चाफे, नितिन पुंड आदिंसह श्री विशाल गणेश सेवा मंडळ व भक्तगण प्रयत्नशील आहेत.

# सनातन धर्म सभेच्यावतीने १५ सप्टेंबर रोजी ऋषीतुल्यांचा सन्मान

नगर – सुमारे १२५ वर्षाची परंपरा असलेल्या सनातन धर्म सभेच्या वतीने ऋषिपंचमीच्या दिनी विविध क्षेत्रात ऋषितुल्य कार्य करणाऱ्या नागरिकांचा सन्मान सन १९०७ पासून केला जात असल्याची माहिती धर्मसभेचे कार्याध्यक्ष वेदमूर्ती दत्तोपंत पाठक यांनी दिली.

यावर्षी संस्थेच्या वतीने वेदमूर्ती सुधाकर जोशी, वेदमूर्ती बंडोपंत मुळे, वेदमूर्ती पांडुरंग मुळे, त्याचप्रमाणे दत्तात्रय भालेराव, योगेश परदेशी, सौ अर्चना गावडे,अशोक कुरापटी, अतुल डावरे मधुकर क्षीरसागर, संजय पारनाईक, अशोकराव करंदीकर आदींचा सत्कार धर्मसभेच्या वतीने १५ सप्टेंबर रोजी संस्थेचे अध्यक्ष वेदमूर्ती घनपाठी महेश रेखे यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष निळकंठ देशमुख व डॉ. नंदकुमार मुळे यांनी दिली. महाजन गल्ली येथील संस्थेच्या ज्ञानेश्वर सभागृह येथे सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होणार आहेत.

या कार्यक्रमास संस्थेचे सर्व सभासद, समाजातील सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे मंत्री दिनकर देशमुख, रमेश देशपांडे, निलेश धर्माधिकारी, खजिनदार उमेश नगरकर, वेदमूर्ती उमेश वालुंजकर व सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

# बाप्पा, यंदा माझी प्रार्थना थोडी वेगळी आहे

प्रिय गणराया,

दरवर्षी तू येतोस

ढोल–ताशांचा गजर होतो, आरती होते, मोदकांचा नैवेद्य दाखवला जातो आणि तुझ्या जयघोषाने आसमंत दुमदुमून जातो.

पण बाप्पा, यंदा तुझ्यासमोर उभा राहिलो आणि हात जोडताना मनात एक वेगळाच प्रश्न आला–

मी माझ्यासाठी काय मागू?

नोकरी? पैसा? घर? सुख? आरोग्य?

नाही बाप्पा

आज मला स्वतःसाठी काहीच मागायचे नाही.

आज मला माझ्या देशासाठी, समाजासाठी मागायचे आहे.

कारण हा देश, समाज सुखी असेल, तर माझे सुख त्यातच आहे.

या देशातील तरुणांच्या डोळ्यात स्वप्ने असतील, शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर समाधान असेल, विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तक असेल आणि प्रत्येकाच्या मनात माणुसकी असेल–तर त्यापेक्षा मोठा प्रसाद माझ्यासाठी दुसरा कोणता?

म्हणून आज तुझ्या चरणी ही विनंती

**बाप्पा, माणसाला माणसापासून तोडू नकोस!**

गणराया, आज माणसाची ओळख त्याच्या माणुसकीपेक्षा त्याची जात, धर्म, प्रांत , राजकीय पक्ष यावरून ठरवली जाताना पाहून मन अस्वस्थ होते. एकाच देशाची माती, एकच आकाश आणि एकच तिरंगा असूनही आपण एकमेकांपासून दूर जात आहोत. धर्माच्या नावावर द्वेष निर्माण करणारे शब्द ऐकले की वाटते– आपण देवाला मानतोय की देवाच्या नावावर माणसाला विसरतोय? बाप्पा, आमच्या श्रद्धा वेगळ्या असतील तरी हृदयातील माणुसकी एकच राहू दे. तिरंग्याखाली उभे राहिल्यावर जात–धर्माच्या भिंती विरघळून 'आपण भारतीय आहोत' ही भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण होऊ दे. आमच्या ओठांवर घोषणा करण्यापेक्षा आमच्या कृतीत बंधुभाव दिसू दे.

**बाप्पा, महागाईच्या ओझ्याखाली दबलेल्या घरांना आधार दे!**

गणराया, आज घर चालवताना अनेक कुटुंबांच्या हातातले गणितच चुकत चालले आहे. महिन्याचे उत्पन्न आले की त्यापूर्वीच किराणा, शिक्षण, आरोग्य, घरखर्च आणि प्रवासाची बिले त्याची वाट पाहत असतात. आईला मुलांच्या इच्छा पूर्ण करता येत नाहीत आणि वडिलांना आपल्या कुटुंबासाठी पुरेसे करता येत नाही याची खंत मनात असते. सण साजरा करताना घरात आनंद असावा; पण खर्चाचा विचार करताना अनेकांच्या चेहऱ्यावर चिंता असते. विघ्नहर्त्या, सामान्य माणसाच्या संसारावरचे आर्थिक ओझे हलके कर. प्रत्येक घरात दोन वेळचे अन्न, मुलांच्या शिक्षणाची खात्री आणि उद्याची आशा राहू दे.

**बाप्पा, आमच्या तरुणांच्या हाताला काम दे!**

गणराया, आज आपल्या देशातील लाखो तरुणांच्या डोळ्यांत मोठी स्वप्ने आहेत; पण त्या स्वप्नांसमोर बेरोजगारीची मोठी भिंत उभी आहे. पदवी हातात आहे, कौशल्य आहे, मेहनत करण्याची तयारी आहे; पण संधी मिळत नाही म्हणून अनेक तरुण निराश होत आहेत. आणि सोशल मीडियाच्या विळख्यात अडकत आहेत. काही वर्षे स्पर्धा परीक्षांची तयारी करूनही संधीची वाट पाहणाऱ्या तरुणांचे वय आणि आशा दोन्ही पुढे सरकत आहेत. तरुणांच्या हातात रोजगाराऐवजी केवळ अर्ज आणि प्रवेशपत्रे राहू नयेत, एवढीच इच्छा आहे. बाप्पा, या तरुणांच्या डोळ्यांतील स्वप्ने विझू देऊ नकोस; त्यांच्या हाताला काम आणि कष्टाला सन्मान दे. भारताची तरुण शक्ती निराश होऊ नये; ती देश घडविण्याची ताकद बनू दे.

**बाप्पा, अन्नदात्याच्या डोळ्यात पुन्हा आनंद आण!**

गणराया, आपल्या ताटातला प्रत्येक घास कोणाच्या तरी घामाने तयार होतो–तो म्हणजे आपला शेतकरी. पाऊस कधी येईल, कधी दगा देईल, बाजारभाव काय मिळेल, खर्च किती वाढेल या प्रश्नांसोबत तो दरवर्षी पुन्हा शेतीत उतरतो. निसर्गाशी लढतो, बाजाराशी झुंजतो आणि कर्जाच्या चिंतेशीही सामना करतो. ज्याच्या कष्टामुळे देशाचे पोट भरते, त्याच्या स्वतःच्या घरात मात्र चिंता असावी, हे दृश्य मनाला बोचते. विघ्नहर्त्या, शेतकऱ्याच्या घामाला योग्य दाम मिळू दे आणि त्याच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळू दे. त्याच्या शेतात हिरवाईसोबत त्याच्या घरातही सुख–समाधानाची पिके येऊ देत.

**बाप्पा, शिक्षणाला पुन्हा समाजबदलाची ताकद दे!**

गणराया, शाळेच्या वर्गात बसलेला प्रत्येक विद्यार्थी म्हणजे देशाच्या उद्याचे एक स्वप्न आहे. पण शिक्षणातील असमानता, वाढता खर्च, सुविधांचा अभाव आणि बदलत्या परिस्थितीमुळे अनेक स्वप्नांना अडथळे येताना दिसतात. गरीब घरातील मुलाने मोठे स्वप्न पाहिले तर त्याला आर्थिक परिस्थितीने थांबवू नये. शिक्षण केवळ परीक्षा, गुण आणि प्रमाणपत्रांपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्याला विचार करायला आणि सत्य–असत्य ओळखायला शिकव. बाप्पा, शिक्षकाला सन्मान, विद्यार्थ्याला संधी आणि प्रत्येक शाळेला आवश्यक साधने मिळू दे. आपल्या देशातील वर्गखोल्यांतून फक्त पदवीधर नव्हे, तर विवेकी, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडू दे.

**बाप्पा, राजकारणात मतभेद ठेव पण मनभेद नको!**

गणराया, लोकशाहीत विचार वेगळे असणारच; पण विचार वेगळे म्हणून माणसे शत्रू व्हावीत, असे नाही. सत्तेची स्पर्धा असावी; पण समाजाची किंमत मोजून नाही. राजकारण लोकांना जोडण्यासाठी असावे, तोडण्यासाठी नाही; विकासासाठी असावे, द्वेषासाठी नाही. ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांनी सामान्य माणसाच्या आयुष्याकडेही तितक्याच संवेदनशीलतेने पाहावे. बाप्पा, निर्णय घेणाऱ्यांना सत्ता ही अधिकार नसून जनतेने दिलेली जबाबदारी आहे, याची जाणीव दे. आणि आम्हालाही विचारपूर्वक प्रश्न विचारणारे, पण द्वेष न करणारे जागरूक नागरिक बनव.

**बाप्पा, आमच्या मनातील माणूस जिवंत ठेव!**

आज तंत्रज्ञान खूप पुढे गेले आहे; पण कधी कधी माणूस माणसापासूनच दूर जातोय असे वाटते. मोबाईलमध्ये हजारो मित्र असतात, पण शेजाऱ्याच्या दुःखाची बातमीही आपल्याला कधी कधी उशिरा कळते. एखाद्याच्या संकटात मदतीचा हात देणे, भुकेल्याला अन्न देणे, दुःखी माणसाचे दोन शब्द ऐकून घेणे–हीच खरी माणुसकी आहे. बाप्पा, आमच्याकडे पैसा कमी–जास्त असू शकतो; पण मनाची श्रीमंती कधी कमी होऊ देऊ नकोस. दुसऱ्याच्या दुःखात डोळे पाणावतील आणि दुसऱ्याच्या आनंदात मनापासून आनंद होईल, अशी संवेदनशील मने दे. कारण शेवटी मंदिर किती मोठे बांधले यापेक्षा माणसाच्या मनात किती माणुसकी जपली, हेच महत्त्वाचे आहे.

बाप्पा, शेवटी एकच मागणे

यंदा तुझ्याकडे सोन्याचा मुकुट मागत नाही, मोठा बंगला मागत नाही, गाडी मागत नाही, स्वतःसाठी यशही मागत नाही. फक्त एवढे करज्या आईच्या स्वयंपाकघरात उद्याच्या जेवणाची चिंता आहे, तिच्या घरात समाधान दे. ज्या वडिलांच्या डोळ्यांत मुलाच्या भविष्याची काळजी आहे, त्यांच्या मनात विश्वास दे. ज्या तरुणाच्या हातात पदवी आहे पण रोजगार नाही, त्याला संधी दे. ज्या शेतकऱ्याच्या कपाळावर कर्जाची चिंता आहे, त्याला आधार दे. ज्या विद्यार्थ्याच्या डोळ्यांत मोठे स्वप्न आहे, त्याच्या स्वप्नाला पंख दे.

आणि बाप्पा


ज्यांच्या मनात जात, धर्म, भाषा, प्रदेश यांची भिंत उभी राहिली आहे, त्या भिंती पाडून तिथे माणुसकीचे घर बांध. तू विघ्नहर्ता आहेस, हे आम्ही मानतो. पण या देशातील विघ्ने दूर करण्यासाठी फक्त तुझ्या चमत्काराची नाही, आमच्या विचारांची आणि कृतीचीही गरज आहे, हे आम्हाला समजण्याची बुद्धी दे.

आम्हाला अशी शक्ती दे की–

अन्याय दिसला तर आवाज उठवू, भूक दिसली तर अन्न देऊ, अज्ञान दिसले तर ज्ञान देऊ, द्वेष दिसला तर प्रेम देऊ, आणि निराशा दिसली तर आशा देऊ. मग कदाचित तुझ्या विसर्जनाच्या दिवशी आमच्या डोळ्यांत पाणी असेल,

पण मनात एक समाधानही असेल– बाप्पा गेला नाही तो आमच्या विचारांत, आमच्या कृतीत आणि आमच्या माणुसकीत राहिला. गणराया,

यंदा एवढेच साकडे– देशातील विघ्ने दूर कर पण त्याआधी आमच्या मनातील विघ्ने दूर कर! गणपती बाप्पा मोरया! मंगलमूर्ती मोरया! माणुसकीचा विजय असो! भारत माता की जय! तुझाच एक सामान्य भक्त


प्रा. सतीश शिर्के

# हेलन पाटोळे यांना राज्यस्तरीय 'उडाण' पुरस्कार



नगर – समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या शिक्षिका हेलन ॲलेक्स पाटोळे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल राज्यस्तरीय 'उडाण' पुरस्काराने गौरविण्यात आले. महिला सक्षमीकरण, गरजू मुलींच्या विवाहासाठी मदत, तंटामुक्ती तसेच वंचित घटकांतील मुलींना शैक्षणिक मदत अशा विविध क्षेत्रांत त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

उडाण फाउंडेशन संलग्न जय असोसिएशन ऑफ एनजीओ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात देशभक्तीपर गीते, नृत्य आणि 'महाराष्ट्राची लोकधारा' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याच कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू डॉ. शबनम शेख यांच्या हस्ते हेलन पाटोळे यांना राज्यस्तरीय 'उडाण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी पुणे येथील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. प्रशांत साळुंके, अवतार मेहेरबाबा ट्रस्टचे संचालक मेहरनाथ कलचुरी, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, जय असोसिएशन ऑफ एनजीओचे राज्याध्यक्ष ॲड. महेश शिंदे, उडाण फाउंडेशनच्या अध्यक्षा आरती शिंदे, शासनाचा राज्य आदर्श युवती पुरस्कार प्राप्त जयश्री शिंदे, ॲड. अनिता दिघे, ॲड. दिनेश शिंदे आदी उपस्थित होते.

हेलन पाटोळे यांनी शिक्षिका म्हणून आपल्या जबाबदारीसोबतच सामाजिक कार्याचीही बांधिलकी जपली आहे. विशेषतः महिला आणि वंचित घटकांतील मुलींच्या प्रश्नांकडे त्यांनी संवेदनशीलतेने पाहत विविध प्रकारे मदतीचा हात पुढे केला आहे. समाजातील गरजू व्यक्तींना आधार देण्याबरोबरच महिलांना सक्षम करण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील आहेत. तंटामुक्तीसाठी पुढाकार घेत समाजातील वाद सामोपचाराने मिटविण्याचा प्रयत्न, आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या गरजू मुलींच्या विवाहासाठी मदत, महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम तसेच गरजू विद्यार्थिनींना शैक्षणिक मदत अशा अनेक माध्यम ांतून त्यांचे सामाजिक कार्य सुरू आहे. विशेषतः समाजातील वंचित घटकांतील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक मदत मिळवून देणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यांना आत्मनिर्भर होण्यासाठी प्रोत्साहन देणे, या कार्यामुळे पाटोळे यांनी सामाजिक क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर हेलन पाटोळे यांनी सामाजिक कार्य हे कोणत्याही पुरस्काराच्या अपेक्षेने केले जात नसल्याचे सांगितले. समाजातील गरजू व्यक्तीला मदत मिळाली, एखाद्या मुलीचे शिक्षण सुरू राहिले, एखाद्या कुटुंबाला अडचणीच्या काळात आधार मिळाला, यातच सामाजिक कार्याचे खरे समाधान आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. मिळालेला पुरस्कार हा आपल्या कार्याची दखल घेणारा असून, या सन्मानामुळे समाजासाठी आणखी जोमाने कार्य करण्याची ऊर्जा मिळणार आहे, असेही त्यांनी सांगितले. पुढील काळातही महिला, मुली आणि वंचित घटकांसाठी अधिक व्यापक स्वरूपात कार्य करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. हेलन पाटोळे यांच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेत त्यांना 'उडाण' पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.


अतुल शेषेराव थोरात यांना इतिहास विषयावरील उल्लेखनीय कार्याबद्दल 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले.


# अतुल थोरात यांना महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार

नगर – महाराष्ट्राच्या प्राचीन ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे सातत्यपूर्ण कार्य करणारे अहिल्यानगर येथील अतुल शेषेराव थोरात यांना इतिहास विषयावरील उल्लेखनीय कार्याबद्दल 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले. शिर्डी येथे बी द चेंज फाऊंडेशनच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

भारतीय सैन्यातील सेवानिवृत्त सुभेदार मेजर सुनील मोहोड हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. यावेळी अभिनेत्री निवेदिता पगार आदी उपस्थित होते.

# निरामय

## धोका 'टेक नेक'चा



जीवनशैली

मोबाईल वापरणाऱ्या सगळ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. फोनच्या वाढत्या वापरामुळे मुलांना टेक-नेकची (तंत्रज्ञानामुळे होणारी मानदुखी) समस्या उद्भवू शकते. आपण मोबाईल स्क्रोल करताना किंवा कॉम्प्युटर बघताना मान समोरच्या बाजुला झुकवतो, तेव्हा मानेवर २२ किलोचा भार पडतो. त्यामुळे फोन वापरणाऱ्या अनेकांना वाकण्याची, कुबड येण्याची किंवा मनगटांवर ताण येण्याची समस्या जाणवते. त्याकडे दुर्लक्ष केल्यास मणक्याला कायमचे नुकसान होऊ शकते.

काही गंभीर प्रकरणांमध्ये शस्त्रक्रियेचीही गरज भासल्याचे समोर आले. मोबाईलच्या स्क्रीनमधून निघणारा निळा प्रकाश हा फक्त डोळेच नाही, तर झोपेची गुणवत्ताही खराब करतो. शिवाय फोनच्या अतिवापरामुळे मानेला सुरकुत्या पडणे, चेहरा वयस्कर दिसणे, त्वचेच्या रंगात बदल होण्यासारख्याही समस्या होऊ शकतात. त्यामुळे मोबाईलचा मर्यादित वापर करणे, मोबाईलसारखी उपकरणे पाहताना मान सरळ ठेवणे गरजेचे आहे. याशिवाय दर २० मिनिटांनी थोडा ब्रेक घेतल्यासही 'टेक-नेक'ची समस्या टाळता येऊ शकते. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपल्या आयुष्याशी जोडली गेलेली वस्तू म्हणजे मोबाईल. मोबाईलच्या अतिवापरामुळे डोळे, मानसिकता यावर होणाऱ्या परिणामांची चर्चा सातत्याने होत असते; मात्र आता एका नवा 'साथीचा रोग' गॅजेट्सच्या अतिवापरामुळे जगभरात पसरतो. 'टेक नेक' किंवा 'फोन बॉडी' असे या नव्या आजाराचे नाव आहे.

आपल्या डोक्याचे नैसर्गिक वजन सर्वसाधारणपणे ४.५ ते ५ किलो असते; मात्र फोनमध्ये पाहताना आपली मान ४५ अंशाच्या कोनात पुढे झुकते. त्यामुळे मानेच्या मणक्यावर तब्बल २२ किलोचा अतिरिक्त भार पडतो. परिणामी लहान वयातच पाठीच्या कण्याचे 'डिस्क डिजनरेशन' आणि स्पॉन्डिलायसिसचा त्रास सुरू होण्याचा धोका असतो. 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ प्रिव्हेंटिव्ह मेडिसिन' या आरोग्यविषयक नियतकालिकात २५ जून २०२५ मध्ये एक शोधनिबंध प्रकाशित झाला होता. स्मार्टफोनचे व्यसन असलेल्या १३ ते १५ वयोगटातील मुलांच्या मणक्यात गंभीर विकृती येण्याची सर्वाधिक शक्यता असल्याचे यात म्हटले होते. हे गंभीर आजार जडवून घ्यायचे नसतील, तर मोबाईल, लॅपटॉप वापरता काही तत्थ्य पाळावीच लागतील.

## उपचारांना लाभले 'एआयचे पंख'



नवे काही

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आता केवळ उद्योग, शिक्षण किंवा माहिती-तंत्रज्ञानापुरती मर्यादित राहिलेली नाही. आरोग्य क्षेत्रातही तिचा वापर झपाट्याने वाढत असून, अनेक गंभीर आजारांचे निदान अधिक वेगाने आणि अचूकपणे करण्यासाठी एआय महत्त्वाची भूमिका बजावत आहे. याच दिशेने शास्त्रज्ञांनी अल्झायमर या स्मृतिभ्रंशाशी संबंधित आजाराच्या लवकर निदानासाठी एक नवे 'एआय'-आधारित तंत्र विकसित केले आहे. या तंत्रामुळे महागडे स्कॅन आणि वेदनादायी चाचण्यांशिवाय काही मिनिटांमध्ये आजाराचा धोका ओळखणे शक्य होणार आहे.

अल्झायमर हा मेंदूशी संबंधित प्रगत स्वरूपाचा आजार असून, त्यामध्ये व्यक्तीची स्मरणशक्ती हळूहळू कमी होत जाते. सुरुवातीला नावे, ठिकाणे, दैनंदिन कामे विसरणे अशी किरकोळ लक्षणे दिसतात; मात्र कालांतराने रुग्णाला स्वत:च्या जवळच्या व्यक्तींचीही ओळख पटेनाशी होते. जागतिक स्तरावर वृद्ध लोकसंख्या वाढत असल्याने हा आजारही वेगाने वाढत आहे. त्यामुळे त्याचे लवकर निदान करणे हे वैद्यकीय क्षेत्रातील मोठे आव्हान मानले जाते. आतापर्यंत अल्झायमरचे निदान करण्यासाठी प्रामुख्याने 'पीईटी स्कॅन', 'एमआरआय' किंवा मणक्यातून 'सेरेब्रोस्पायनल फ्लुइड' घेण्याची चाचणी करावी लागत होती. या तपासण्या खर्चिक, वेळखाऊ आणि अनेकदा रुग्णांसाठी त्रासदायक ठरतात. शिवाय, लहान शहरांमधील रुग्णालयांमध्ये या सुविधा सहज उपलब्ध नसतात. त्यामुळे अनेक रुग्णांचे निदान उशिरा होते.

नवीन 'एआय' तंत्रज्ञान या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करत आहे. या प्रणालीमध्ये रुग्णाचे वय, रक्त तपासणीचे अहवाल, वैद्यकीय इतिहास आणि इतर आरोग्यविषयक माहितीचे विश्लेषण केले जाते. त्याचबरोबर मेंदूमध्ये होणारे अगदी सूक्ष्म बदल कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने ओळखले जातात. हे बदल पारंपरिक स्कॅनमध्ये अनेकदा स्पष्टपणे दिसून येत नाहीत. 'एआय' मात्र या माहितीचे विश्लेषण करून भविष्यात अल्झायमर होण्याचा धोका किती आहे, याचा अंदाज काही मिनिटांमध्ये देऊ शकते. या तंत्रज्ञानाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे निदानाचा कालावधी आणि खर्च मोठ्या प्रमाणात कमी होणे. पारंपरिक 'पीईटी स्कॅन'साठी भारतात साधारणपणे एक ते दोन लाख रुपयांपर्यंत खर्च येऊ शकतो. त्याउलट, नव्या 'एआय'-आधारित तपासणीसाठी अंदाजे सात ते दहा हजार रुपये खर्च येतो आणि अवघ्या १८ मिनिटांत अहवाल उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे ही पद्धत अधिक सुलभ आणि परवडणारी ठरण्याची शक्यता आहे.

अल्झायमरवर अद्याप पूर्णपणे उपचार उपलब्ध नसले, तरी आजाराचे लवकर निदान झाल्यास औषधोपचार, नियमित व्यायाम, संतुलित आहार, मानसिक व्यायाम आणि जीवनशैलीतील बदल यांच्या मदतीने त्याची प्रगती मोठ्या प्रमाणात मंदावता येते. त्यामुळे रुग्णाचे जीवनमान अधिक काळ चांगले राखणे शक्य होते. तथापि, हे तंत्रज्ञान व्यापक प्रमाणावर वापरण्यापूर्वी विविध लोकसंख्येवर त्याची अचूकता, विश्वासार्हता आणि दीर्घकालीन परिणामकारकता तपासणे आवश्यक आहे. वैद्यकीय तज्ज्ञांची अंतिम पडताळणी आणि नियामक संस्थांची मान्यता मिळाल्यानंतरच ते नियमित आरोग्य सेवेत समाविष्ट होईल.

## लहान मुलांमध्ये थायरॉईडचा विकार

थायरॉईड हा आजच्या काळात एक सामान्य आजार झाला आहे. १००पैकी ९५ लोकांना थायरॉईड हा आजार आहे. या आजारामुळे व्यक्तीचे वजन झपाट्याने कमीहोते किंवा वाढते. एकदा हा आजार झाला, की तो नियंत्रणात ठेवण्यासाठी आयुष्यभर औषधे घ्यावी लागतात, असेदेखील म्हटले जाते. आणखी एक गैरसमज म्हणजे हा आजार फक्त तरुणांनाच होतो; पण तुमच्या मुलांचे वजन झपाट्याने वाढत असेल किंवा कमी होत असेल, तर पालकांनी त्यांच्या थायरॉईडची तपासणी करून घ्यावी.




जाणून घ्या

लहान मुलांनाही थायरॉईडचा त्रास होऊ शकतो, विशेषत: हायपोथायरॉईडीझमचा. यात थायरॉईड ग्रंथी पुरेशा प्रमाणात थायरॉईड हार्मोन तयार करत नाही. हे हार्मोन मुलांमध्ये योग्य वाढ, मेंदूचा विकास आणि ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असते. तुमच्या मुलाचीकिंवा मुलाची उंची किंवा शारीरिक विकास त्यांच्या वयाच्या मानाने मंद असेल किंवा त्यांना पौगंडावस्था उशिरा येत असेलतर डॉक्टरांचा सल्ला अवश्य घ्या. दुसरी गोष्ट म्हणजे, पुरेशी झोप घेऊनहीतुमचे मूल सतत थकलेले असेल, तर त्याला केवळ आळस समजून दुर्लक्ष करू नका.

तिसरी गोष्ट म्हणजे, एखाद्या मुलाला शाळेत लक्ष केंद्रित करण्यास अडचण येत असेल, गोष्टी लक्षात ठेवण्यात त्रास होत असेल किंवा त्याच्या शालेय कामगिरीत अचानक घट दिसू लागली असेल, तर त्याचे कारण थायरॉईडची समस्या असू शकते. वजन वाढणे आणि बद्धकोष्ठता हेदेखील एक लक्षण असू शकते, कारण थायरॉईड ग्रंथीच्या कमी कार्यामुळे चयापचय आणि पचनक्रिया दोन्ही मंदावतात. तुमच्या मुलाला इतर मुलांपेक्षा जास्त थंडी जाणवत असेल, त्याची त्वचा खूप कोरडी असेल किंवा त्याच्या मानेच्या पुढच्या भागात सूज असेल, तर या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. थायरॉईडच्या आजारावर उपचार शक्य आहेत. त्यामुळे जर तुम्हाला एकाच वेळी यापैकी अनेक लक्षणे दिसली, तर तुमच्या मुलाला नक्कीच बालरोगतज्ज्ञाकडे घेऊन जा. एका साध्या रक्त तपासणीद्वारे याचे निदान होऊ शकते. वेळेवर उपचार केल्यास मुलाची वाढ आणि विकास सामान्य राहील.

## योगनिद्रा ठरेल प्रभावी



मात्रा आयुर्वेदाची

शांत, निवांत झोप प्रत्येकालाच हवी असते. पण सध्याच्या धकाधकीच्या जीवनात अशी झोप मिळतेच असं नाही. अपुऱ्या झोपेमुळे आरोग्य बिघडतं. खूप चिडचिड होते. योग निद्रेमुळे तुम्ही शांत झोपेची अनुभूती घेऊ शकता.

✻ अपुऱ्या झोपेमुळे रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. नैराश्य येतं. मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. मात्र रात्री योग निद्रा केल्यामुळे शांत झोप लागू शकते.

✻ योगनिद्रेमुळे ताण कमी व्हायला मदत होते. योगनिद्रेमध्ये आपल्याला शरीरातल्या लहरींची जाणीव होते. यामुळे विविध मानसिक आजार बरे होऊ शकतात, ही बाब एका संशोधनातून समोर आली आहे. 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ योगा'मध्ये हा शोध प्रसिद्ध झाला आहे.

✻ योगनिद्रेदरम्यान शरीराला निवांतपणा लाभतो. या काळात शरीराची झीज भरून निघू शकते. यामुळे रोगप्रतिकारक क्षमता सुधारते. दाह कमी होतो.

✻ योगनिद्रेमुळे मधुमेहाचा सामना करता येतो. यामुळे रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रित राहतं. मधुमेहींना खूप उत्साही वाटतं. त्यामुळे मधुमेहींनी योगनिद्रा करायला हवी.

✻ आयुष्यात घडलेल्या दु:खद प्रसंगांमुळे अनेकांना धक्का बसतो. योगनिद्रेमुळे या धक्क्याची तीव्रता कमी होऊ शकते.

✻ योगनिद्रेमुळे आपण आपल्या आत्म्याशी थेट जोडले जातो. आपण आपल्या आत डोकावून बघू शकतो. नकारात्मक विचारांचा प्रभाव कमी होतो. शरीरात सकारात्मक ऊर्जेचा संचार होऊ लागतो.

## फॅटी लिव्हरच्या प्रमाणात वाढ




आरोग्य वार्ता

डॉ. प्रसन्नने

फॅटी लिव्हर या आजाराला 'मेटाबॉलिक डिसफंक्शन असोसिएटेड फॅटी लिव्हर डिसीज' (एमएएफएलडी) म्हणतात, ज्याला पूर्वी 'नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज' (एनएएफएलडी) म्हटले जात असे. जेव्हा यकृतामध्ये जास्त चरबी जमा होते, तेव्हा हा आजार होतो. तो लठ्ठपणा, मधुमेह आणि उच्च कोलेस्ट्रॉलसारख्या आजारांशी संबंधित आहे. अलिकडेच आरोग्यमंत्र्यांनी सांगितले की राष्ट्रीय नॉन-कम्युनिकेबल डिसीज कंट्रोल प्रोग्रामअंतर्गत, फॅटी लिव्हर रोखण्यासाठी आणि व्यवस्थापित करण्यासाठी निरोगी खाणे, दररोज व्यायाम, वजन नियंत्रण आणि जास्त साखर आणि चरबी टाळणे आवश्यक असल्याचे वर्णन केले आहे. राज्यांना सांगण्यात आले आहे, की डॉक्टरांनी मार्गदर्शक तत्त्वांनुसार तपासणी करावी आणि गरज पडल्यास रुग्णाला योग्य उपचार द्यावेत.

पहिला अभ्यास २०२५ मध्ये 'नेचर सायंटिफिक रिपोर्ट्स जर्नल'मध्ये प्रकाशित झाला होता. त्यात हैदराबादच्या ३४५ आयटी कर्मचाऱ्यांचा समावेश होता. अहवालात असे आढळून आले, की ३४ टक्के कर्मचाऱ्यांना मेटाबॉलिक सड्रोम होता आणि ८४ टक्के कर्मचाऱ्यांच्या यकृतात चरबी होती. म्हणजेच आयटी क्षेत्रात ही समस्या खूप सामान्य आहे. दुसरा अभ्यास 'आयसीएमआर'ने केला होता. यामध्ये राजस्थानातील अनेक गावांमध्ये यकृत रोग, मधुमेह आणि रक्तदाबाचा धोका दिसून आला. असे आढळून आले, की सुमारे ३७ टक्के लोकांना फॅटी लिव्हर आहे आणि ही समस्या पुरुषांमध्ये जास्त आहे.

## महत्त्व डाळींचं



काय खावं?

डाळींमधून भरपूर प्रथिनं मिळतात. शाकाहारींसाठी डाळी हा प्रथिनांचा मुख्य स्रोत मानला जातो. डाळींमध्ये प्रथिनांसोबतच इतरही पोषक घटक असतात. म्हणूनच रोजच्या आहारात डाळींचा समावेश करायला हवा. विविध प्रकारच्या डाळी खायला हव्यात. डाळींमुळे शरीराला होणाऱ्या लाभांविषयी...


✻ डाळींमध्ये प्रथिनांसोबतच लोह आणि फोलेट नावाचा घटक असतो. वजन कमी करण्यासोबतच स्नायूंच्या बांधणीसाठी प्रथिनांची गरज असते. डाळींमधून ही प्रथिनं मुबलक प्रमाणात मिळू शकतात.

✻ डाळींमध्ये पॉलिफेनॉल्स हा घटक असतो. यात अँटी ऑक्सिडंट्स आणि दाह कमी करणारे गुण असतात. यामुळे फ्री रॅडिकल्समुळे झालेलं नुकसान भरून निघायला मदत होते.

✻ डाळींमुळे हृदयाचं आरोग्य चांगलं रहातं. डाळीत उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळवण्यासोबत कोलेस्टरॉल कमी करणारे गुणधर्मही असतात.

✻ डाळ भात हा परिपूर्ण असा आहार आहे. डाळ भात खाल्ल्यामुळे शरीराला आवश्यक ती अमिनो ॲसिड्स मिळतात.

## पावसाळ्यात वाढते 'ड्राय आय'ची समस्या



ऋतुचक्र

पावसाळ्याच्या आगमनाने कडक उन्हापासून दिलासा मिळतो. पावसामुळे धूळ, धूर आणि प्रदूषण कमी होऊन वातावरण स्वच्छ होते. हवेत गारवा आणि आर्द्रता वाढते. त्यामुळे अनेकांना वाटते, की या ऋतूमध्ये डोळ्यांच्या कोरडेपणाची समस्या कमी होईल; मात्र प्रत्यक्षात पावसाळ्यात 'ड्राय आय' (डोळे कोरडे पडणे) या समस्येचे प्रमाण वाढताना दिसते.

मुसळधार पाऊस आणि पाणी साचल्यामुळे रस्ते आणि रेल्वे वाहतुकीवर परिणाम होतो. अशा परिस्थितीत अनेकजण घरातूनच काम करण्यास प्राधान्य देतात. अनेक पालकही जोरदार पावसाच्या दिवशी मुलांना शाळेत पाठवणे टाळतात. पावसाळ्यात घरात अधिक वेळ घालवल्यामुळे आपल्या दैनंदिन जीवनशैलीत अनेक बदल होतात आणि याच बदलांमुळे डोळे कोरडे पडण्याच्या समस्या वाढतात. घरात राहिल्यामुळे लॅपटॉप, मोबाईल, टीव्ही आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढतो.

केवळ प्रौढच नव्हे तर लहान मुलांचाही 'स्क्रीन टाइम' वाढतो. पावसाळी वातावरणात चित्रपट किंवा वेब सिरीज सलग पाहण्याची सवय अनेकांना असते. त्यातच बंद खिडक्या आणि एअर कंडिशनरचा दीर्घकाळ वापर यामुळे डोळ्यांवर अधिक ताण येतो. स्क्रीनकडे एकटक पाहताना पापण्या लवण्याचे प्रमाण कमी होते. त्यामुळे डोळ्यांतील अश्रू लवकर आटतात आणि डोळे कोरडे पडतात. परिणामी डोळे लाल होणे, जळजळ, खाज येणे, डोळे थकणे, ताण जाणवणे आणि सूज येणे अशा समस्या निर्माण होतात. पावसाळ्यात डोळ्यांच्या ॲलर्जीचे प्रमाणही वाढते आणि त्यामुळे विशेषत: मुलांमध्ये ड्राय आयची लक्षणे अधिक तीव्र होऊ शकतात.

**पावसाळ्यात डोळ्यांची काळजी कशी घ्याल?**

*सलग आणि दीर्घकाळ स्क्रीनचा वापर टाळा.

*२०-२०-२० नियम पाळा दर २० मिनिटांनी, २० फूट दूर असलेल्या वस्तूकडे २० सेकंद पाहा.

*जाणीवपूर्वक वारंवार पापण्या लवण्याची सवय लावा.

*स्क्रीन डोळ्यांच्या पातळीपेक्षा किंचित खाली ठेवा, त्यामुळे डोळ्यांचा ताण कमी होतो.

*एसी किंवा पंख्याच्या थेट हवेच्या प्रवाहात बसणे टाळा, कारण त्यामुळे अश्रू लवकर आटतात.

*डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ल्युब्रिकेटिंग आय ड्रॉप्स (कृत्रिम अश्रू) वापरा.

*दिवसभर पुरेसे पाणी प्या आणि शरीर हायड्रेट ठेवा.

*डोळ्यांशी संबंधित कोणताही त्रास जाणवल्यास त्वरित नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घ्या.

## वारंवार चक्कर येते?

काळजी घ्या

सध्या वातावरणात सतत बदल होत आहेत. त्याचे परिणाम आपल्या आरोग्यावर होतात. अनेक जण कामाच्या गडबडीत आरोग्याकडे लक्ष देत नाहीत. हे पुढे जाऊन धोक्याचे ठरू शकते. अनेक लोक सामान्य थकवा, हवामानातील बदल किंवा तणावामुळे वारंवार चक्कर येण्याकडे दुर्लक्ष करतात; पण ही समस्या वाटते तितकी सोपी नाही. कधीकधी हे शरीरातील आवश्यक जीवनसत्त्वांच्या कमतरतेचे लक्षण असू शकते; पण कमी रक्तदाब, निमिया, शरीरातील पाण्याची कमतरता आणि इतर आरोग्य समस्यांमुळेही चक्कर येऊ शकते.

व्हिटॅमिन बी १२, फोलेट (व्हिटॅमिन बी९) आणि व्हिटॅमिन डी यांच्या कमतरतेमुळे देखील चक्कर येऊ शकते. लाल रक्तपेशींच्या निर्मितीसाठी व्हिटॅमिन बी १२ आणि फोलेट आवश्यक असतात. यांच्या कमतरतेमुळे निमिया होऊ शकतो. त्यामुळे मेंदू आणि शरीराला पुरेसा ऑक्सिजन मिळत नसल्याने चक्कर येणे, अशक्तपणा आणि थकवा जाणवू शकतो. व्हिटॅमिन-डीच्या कमतरतेमुळे स्नायू कमकुवत होऊ शकतात आणि तोल जाऊ शकतो. यामुळे काही लोकांना चक्कर येते किंवा अस्थिरता जाणवते.

सतत अशक्तपणा आणि थकवा जाणवत असेल तर, तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्या. श्वास लागणे, अंधुक दृष्टी, हात आणि पायांना मुंग्या येणे, चालण्यात अडचण, बेशुद्ध



होणे, तीव्र डोकेदुखी किंवा छातीत दुखणे यांसारख्या समस्या असतील तर डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्या, आहारात बदल करा. तुम्हाला वारंवार चक्कर येत असेल, तर स्वत:हून औषधोपचार करू नका किंवा व्हिटॅमिन सप्लिमेंट्स घेऊ नका. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आवश्यक रक्त तपासण्या करून घ्या. संतुलित आहार, भरपूर पाणी आणि चांगली झोप आरोग्य राखण्यासाठी उपयुक्त ठरतात. चक्कर येण्यासोबतच छातीत दुखणे, श्वास घेण्यास त्रास होणे, बोलण्यात अडचण येणे किंवा बेशुद्ध पडणे अशी लक्षणे दिसत असतील, तर तात्काळ वैद्यकीय मदत घेणे अत्यावश्यक आहे.

### नवसंशोधन

## एकटे आहात...



एकटं असणं आपल्या मानसिक आरोग्यासाठी खूप चांगलं असतं. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. एकटं राहिल्यामुळे फक्त मानसिकच नाही तर शारीरिक आरोग्यही चांगलं राहतं. नातेसंबंधांशी संबंधित बरीच संशोधनं होत असतात. असंच एक संशोधन मध्यंतरी झालं होतं. कॅलिफोर्निया विद्यापीठात हे संशोधन करण्यात आलं होतं. एकटे लोक विवाहित कवा रिलेशनशीपमध्ये असणाऱ्यांपेक्षा अधिक निरोगी असतात, ही बाब या संशोधनातून समोर आली होती. दुसऱ्या एका संशोधनातूनही ही बाब समोर आली आहे. त्यामुळे एकटं असणाऱ्यांनी घाबरण्याचं काहीच कारण नाही.

### फूटकेअर

## योग्य पादत्राणं निवडा



चुकीच्या पादत्राणांमुळे पाठीचा कणा तसंच पायांना दुखापत होऊ शकते. मात्र याकडे आपण कधीही लक्ष देत नाही. चुकीच्या पद्धतीने चालल्यामुळे आपल्या पायांचा आकारही बदलू शकतो. त्यामुळे पादत्राणं घेताना फॅशनऐवजी आरोग्याचा विचार करणं गरजेचं आहे. उंच टाचेच्या चपलांमुळे नसांवर ताण येतो. या पादत्राणांमुळे तुम्ही उंच दिसत असलात तरी यामुळे गुडघेदुखी, आर्थ्रायटिस तसंच पायांचं दुखणं मागे लागू शकतं. त्यामुळे योग्य प्रकारच्या पादत्राणांचा वापर करा.

### काळजी त्वचेची


## निरोगी त्वचेसाठी...



निरोगी, नितळ त्वचा हे प्रत्येक महिलेचं स्वप्न असतं. चुकीचा आहार, प्रदूषण, रसायनांचा वापर यामुळे त्वचेतला तजेला कमी होतो. पोषक आहार, व्यायाम तसंच नैसर्गिक उत्पादनांचा वापर करून तुम्ही त्वचेचं आरोग्य टिकवून ठेऊ शकता. यासोबतच काही चुकाही टाळल्या पाहिजेत. बॉडी लोशन चेहऱ्याला लावू नका. बॉडी लोशनमध्ये तेलाचं प्रमाण अधिक असतं. चेहऱ्याला एवढ्या तेलाची गरज नसते. त्यामुळे बॉडी लोशनऐवजी चेहऱ्यासाठी तयार करण्यात आलेलं क्रीम लावा. अंड्याचा पांढरा भाग चेहऱ्याला लावला जातो. पण अंड्याची ॲलर्जी असल्यास या पांढऱ्या भागाचा वापर करू नये.

### आजीबाईचा बटवा

## संत्र्याच्या बिया लाभदायी



संत्र्याच्या सालींबद्दल आपण ऐकलं आहे. पण संत्र्याच्या बियांचं काय, त्या तर फेकून दिल्या जातात.वास्तविक त्यांच्या सेवनाने वजन कमी व्हायलाही मदत होते. संत्र्याच्या बियांमुळे उच्च रक्तदाब नियंत्रणात राहतो. 'बी ६' हे जीवनसत्त्व आणि मॅग्नेशियममुळे संत्र्याचं बी प्रभावी ठरतं. संत्र्याच्या बियांपासून निघणारं तेल केसांसाठी पोषक असतं. ते तेल उत्तम कंडिशनर म्हणून काम करतं. या बियांमध्ये ॲटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. म्हणूनच मग रोप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी संत्र्याच्या बियांचं सेवन करता येईल.

# भगवान महावीरांचे अहिंसेचे तत्वज्ञान मनमनात रूजावे

## अमृता फडणवीस यांचे प्रतिपादन; आनंद तीर्थ समवशरण येथील समर्पण चातुर्मास कार्यक्रमास उपस्थिती



दिव्याज फाउंडेशनच्या ट्रस्टी अमृता देवेंद्र फडणवीस यांनी आनंद तीर्थ समवशरण येथे उपस्थित राहून या आध्यात्मिक पर्वणीचा लाभ घेतला.

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पावन भूमीत सध्या समर्पण चातुर्मास सुरू असून पर्युषण पर्व अनुष्ठाना यातील विविध धार्मिक कार्यक्रमांना नगरसह देशभरातून आलेले भाविक हजेरी लावत आहेत. १२ सप्टेंबर रोजी सकाळी दिव्याज फाउंडेशनच्या ट्रस्टी अमृता देवेंद्र फडणवीस यांनी आनंद तीर्थ समवशरण येथे उपस्थित राहून या आध्यात्मिक पर्वणीचा लाभ घेतला.

यावेळी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज, उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी महाराज, आलोकऋषीजी महाराज, तिर्थेशऋषीजी महाराज, सत्यप्रभाजी म.सा., अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींसह आ. संग्राम जगताप, सौ. धनश्री सुजय विखे पाटील, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे उद्योगपती आणि अहिल्यानगरचे सुपुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराज बोरा, प्रमिलाताई हेमराज बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, पराग बोरा व परिवारातील सदस्य, समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, चातुर्मास भोजन कमिटीचे संतोष पिपाडा, संजय ताथेड, नितीन चंगेडिया, किरण राका, सुधीर मुनोत, राजकुमार शेटिया, महेश गुगळे, आशिष खंडेलवाल, राहुल गांधी, चेतन गुगळे, गिरीष पटवा, राजेश बोरा, अमित मुथा, अमर बोरा, सचिन बोरा, किशोर डागा, मनिष मुंदडा, विनोद कटारिया, चातुर्मास कमिटी लेडीज विंगच्या प्रीतम राका, शैला ताथेड, नीता पिपाडा, भारती पोखरणा, प्रियांका चंगेडिया आदी उपस्थित होते. समर्पण चातुर्मास कमिटीच्या लेडीज विंगने अमृता फडणवीस, धनश्री विखे पाटील यांचे स्वागत व सत्कार केला. चातुर्मास कमिटीने आ. संग्राम जगताप, अनिल मोहिते यांचा सत्कार केला.

प्रविणऋषीजी महाराज म्हणाले, इतर सर्व सण उत्सवात भरपेट जेवण केले जाते. पण पर्युषण पर्व हा संयमाचा उत्सव आहे. यात जप तप आणि उपवास केले जातात. येथे आज लहान मुलेही अट्ठाई उपवास करत आहेत. आत्मपरीक्षण करण्याचा हा उत्सव आहे. यात क्षमा, अहिंसा आणि मैत्रीची शिकवण असते. गुरूदेव आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पुण्यस्मृतीनिमित्त महाराष्ट्र शासनाने १९९२ मध्ये लोकराज्य विशेषांक प्रकाशित केला होता. गुरूदेवांची जन्मभूमी चिचोंडी तर दीक्षा भूमी मिरी आहे आणि पुण्यभूमी अहिल्यानगर आहे. या ठिकाणी त्यांनी अंतिम क्षणापर्यंत भाविकांना दर्शन, आशीर्वाद दिले. आचार्यश्रींच्या प्रेरणेने शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रातही मोठे काम चालू आहे. मिरी येथील दीक्षा भूमीत शासकीय जागा मिळावी असा आग्रह असून अमृता फडणवीस यांनी ही मागणी मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहचवावी.

अमृता फडणवीस म्हणाल्या की, अतिशय पवित्र समर्पण चातुर्मास व पर्युषण पर्व काळात नगरमध्ये येण्याचे सौभाग्य लाभले आहे. चातुर्मास केवळ धर्मासाठी नसून राष्ट्र जागृती, संस्कृती, युवा वर्गासाठी, महिला सन्मानासाठी आहे. भगवान महावीर यांनी स्वतः वर विजय मिळवण्याची शिकवण दिली. प्रत्येकाने आपल्या मनातील क्रोध, लोभ, अहंकार हे अवगुण दूर केले पाहिजे. शरीरानेच नाही तर मनानेही हिंसा होणार नाही हे अहिंसेचे हे तत्व जीवनात आचरणात आणले पाहिजे. आजच्या काळातील युद्धजन्य, अशांततेची परिस्थिती बदलायची तर भगवान महावीरांचे 'जगा आणि जगू द्या' हे तत्वज्ञान मनमनात रूजले पाहिजे. आताचे युग स्पर्धेचे आहे, धावपळीचे आहे. पण हे करताना आपले मूळ संस्कार विसरता कामा नये. या ठिकाणी आल्यानंतर खूप कमी वेळात अतिशय मोठी सकारात्मक ऊर्जा मिळाली आहे.

आ. संग्राम जगताप म्हणाले, नगरमधील समर्पण चातुर्मासात आज अमृता फडणवीस आवर्जून उपस्थित राहिल्या आहेत. आचार्यश्रींचे समाधीस्थळ अहिल्यानगर शहरात आहे. प्रविणऋषीजी महाराज यांच्या अहिल्यानगर येथील चातुर्मासात पुढच्या अनेक पिढ्यांना उपयुक्त ठरणारे अनमोल मार्गदर्शन मिळत आहे. चातुर्मास कमिटीने अतिशय उत्कृष्ट नियोजन केले आहे. सौरभ बोरा परिवारानेही अतिशय श्रद्धेने चातुर्मासासाठी मोठे योगदान दिले आहे. जैन धर्मातील क्षमापनाचे संस्कार सगळ्यांनीच आचरणात आणल्यास भारत अधिक बलशाली होईल.

सौरभ बोरा म्हणाले, आचार्य आनंदऋषीजी महाराज यांची जन्मभूमी आणि तपोभूमी असलेल्या अहिल्यानगरमध्ये उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी महाराज यांचा १७ वर्षांनंतर समर्पण चातुर्मास होत असल्याने भाविकांमध्ये प्रचंड उत्साह आहे. देशाच्या विविध भागांतून भाविक चातुर्मास तसेच पर्युषण पर्व आराधनेसाठी नगरला आले आहेत. भारत जगातील चौथी मोठी आर्थिक शक्ती असून यात जैन समाजाचा मोठा वाटा आहे. जैन समाज धर्म कार्य, समाज कार्यातही अग्रेसर आहे. युवा पिढीला आपल्या उज्वल परंपरेशी जोडण्याचे काम या चातुर्मासात होत आहे. क्षमापनासारख्या महान पर्वाचा हिस्सा असणे सर्वांसाठी गौरवास्पद आहे.

तिर्थेशऋषीजी महाराज यांनी उपाध्यायश्रींच्या अर्हम विज्ञा कार्यक्रमाची व शिराळ चिचोंडी येथील आनंद तीर्थ प्रकल्पाची माहिती दिली. चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा यांनी स्वागत केले.

याप्रसंगी श्रावक श्राविका उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रसाद बेडेकर यांनी केले.



## गुरुवाणी – ४८

### सज्जनांनी शक्तीशाली व्हावे

जे युगपुरुष असतात ते वर्तमानातील घटनांतून बोध घेऊन अशा घटना पुन्हा होऊ नये यासाठी प्रयत्न करतात. ते असा विचार नाही करत की, ही वेळ तर येणारच होती व ती कोण रोखणार. ते स्वतः जबाबदारी स्विकारतात. 'जिसका प्रारंभ है, उसका अंत पक्का है'. केवळ एकच अवस्था अशी आहे ज्याची सुरुवात आहे पण शेवट नाही. ती आहे सिद्ध अवस्था. द्वारकेचा विनाश तर अटळच होता पण आपण ही नगरी वाचवण्यासाठी प्रयत्न करू शकतो हा विचार श्रीकृष्णाने केला. यासाठी विनाशाचे कारण त्यांनी शोधायचे ठरवले. महाभारत कोणत्या एका कारणाने नाही होत. आपण नेहमी म्हणतो माझा अपेक्षाभंग झाला. तीर्थंकर परमात्मा सांगतात, 'तुम्ही भ्रमात राहता म्हणून भ्रमनिरास होतो'. जीनवानी म्हणजे सत्य. सत्यापेक्षा वेगळी अपेक्षा केली तरच अपेक्षाभंग होतो. समोरच्याची योग्यता, सामर्थ्य, क्षमता नसताना त्याच्याकडून अपेक्षा ठेवली तर अपेक्षाभंग होणारच. जे शक्य आहे ते केल्याशिवाय राहू नका. जे अशक्य आहे ते मी करेलच हा ठाम विश्वासही हवा. आंब्याच्या झाडाकडून नारळाची अपेक्षा करणे चुकीचेच आहे. श्रीकृष्णाने अरिष्टनेमींना द्वारका विनाश कशामुळे होईल याबाबत विचारणा केली. घराला आग लावणारा दिवा विझवला तरच घर वाचू शकेल. कैकयीची मागणी पूर्ण चुकीची होती पण रामाने अयोध्यारूपी घर वाचवण्यासाठी त्यांनी वनवास पत्करला. आपले घर वाचवण्यासाठी तुम्ही रामाचा आदर्श समोर ठेवा. नियतीला आव्हान देणारेच युगपुरुष ठरतात. श्रीकृष्णाला अरिष्टनेमींनी सांगितले, ' द्वारका विनाशाचे कारण दारू ठरेल'. आजकाल मोठ्या शहरात मुलांबरोबर मुलीही व्यसनाधीन झाल्याची वस्तुस्थिती आहे. आजच ही पिढी सांभाळली नाही तर भविष्य अवघड होईल. श्रीकृष्णाने द्वारकेतून दारू हद्दपार केली. एक दिवस यादव कुमारांना दारू मिळतेच आणि नशेमध्ये असताना ते ऋषींना त्रास देतात. परिणामी मजबूर झालेले ऋषी द्वारका विनाशाचा निर्धार करतात. श्रीकृष्ण ऋषींकडे जाऊन स्वतः क्षमा मागतात. तेव्हा ऋषी द्वारकेला अभय देण्यास नकार देतात. श्रीकृष्ण पुन्हा अरिष्टनेमींकडे धाव घेतात. तेव्हा ते श्रीकृष्णाला द्वारकेत आयंबिल तप करण्याचा सल्ला देतात. ऋषी पाहतात आयंबिल सुरू आहे. त्यामुळे ते सुद्धा शांत होतात. पण कालांतराने द्वारकावासीयांना आयंबिलचा विसर पडतो आणि ऋषींनी द्वारका विनाशाचा संकल्प पूर्ण केला. सज्जनांचे कमजोर होणे धोक्याचे आहे आणि दुर्जन शक्तीशाली होणे धोकादायक असते.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**



### अमृता फडणवीस यांचे शहर भाजपच्या वतीने स्वागत

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी सौ.अमृता फडणवीस या शनिवारी सकाळी अहिल्यानगर शहरात आल्या असता हेलीपॅडवर त्यांचे शहर भाजपाच्या वतीने जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी स्वागत केले.

# कैलास नागरी पतसंस्थेची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

नगर – येथील कैलास नागरी सहकारी पतसंस्थेची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच खेळीमेळीत संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षपदासाठी संस्थेचे चेअरमन रखमाजी निस्ताने यांच्या नावाची सूचना सुभाष दारवेकर यांनी मांडली. त्यास गंगानाथ सोनवणे यांनी अनुमोदन दिले. सेक्रेटरी शंकर मिसाळ यांनी नोटीस वाचन केले. सभेचे अध्यक्ष रखमाजी निस्ताने यांनी सर्व विषय जाहीर केले व ते एकमताने मंजूर करण्यात आले.

संस्थेचे चेअरमन रखमाजी निस्ताने यांनी संस्थेविषयी माहिती देताना सांगितले की, ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेला ११.९ लाख रूपये नफा झाला असून ठेवी १४६७.४६ लाख रुपये आहेत. संस्थेचे भाग भांडवल २८.२५ लाख रुपये असून सन २०२५– २६ या आर्थिक वर्षासाठी सभासदांना १२ टक्के डिव्हीडंड देण्यात येणार असल्याचे जाहीर केले.



कैलास नागरी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गौरव करताना पदाधिकारी.

संस्थेच्या वतीने सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा बक्षिसे देवून गौरव करण्यात आला. सभेस संस्थेचे व्हा. चेअरमन चंद्रकांत औशिकर, संचालक सागर चवंडके, जगन्नाथ बहिरवाडे ॲड. अमोल निस्ताने, अनंत औशिकर, होनाजी गोडळकर, उषा खताडे, जयश्री बिडकर तसेच सभासद मधुकर मुळे, सुभाष दारवेकर, गंगानाथ सोनवणे, चंद्रकांत दहिंडे, अनिल आखमोडे, बाळू खताडे, मारुती गोंधळे, ठाणसींग गोडळकर, अशोक दिवटे, अशोक धजाल, आबासाहेब हुच्चे, संतोष भागानगरे, अनिल आखमोडे, सुरेश केवटे, साळीग्राम बारसे, शंकरराव बारसे, बळवंत गोगटे, कांतीलाल परमार तसेच महिला सभासदही उपस्थित होते. सुभाष दारवेकर व होनाजी गोडळकर यांनी सभा पार पाडण्यासाठी सहकार्य केले. व्हा. चेअरमन चंद्रकांत औशिकर यांनी सभासदांचे आभार मानले.

# डॉ. सुप्रिया चिकोडी यांचा विश्वविक्रम; एका दिवसात २,३०० पुस्तकांचे वितरण



एका दिवसात २,३०० पुस्तकांचे वितरण करत विश्वविक्रम केल्या बद्दल डॉ. सुप्रिया चिकोडी यांना प्रमाणपत्र देताना डॉ. दीपक हरके व मान्यवर

नगर – विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्याला बळ देत त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला सकारात्मक दिशा देण्याच्या उद्देशाने डॉ. सुप्रिया अवधूत चिकोडी (राजे) यांनी केलेल्या अभिनव पुस्तक वितरण उपक्रमाची विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली आहे. ९ सप्टेंबर रोजी एकाच दिवसात तब्बल २,३०० पुस्तके विद्यार्थ्यांना वितरित करून त्यांनी यापूर्वीचा १,१०३ पुस्तकांचा विक्रम मोडीत काढला.

उत्तर प्रदेशातील रवींद्र नाथ मौर्य यांनी विद्यार्थ्यांना एका दिवसात १,१०३ पुस्तके वितरित करण्याचा विक्रम नोंदविला होता. डॉ. सुप्रिया चिकोडी यांनी त्यापेक्षा १,१९७ अधिक पुस्तके वितरित करत नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विनर्स बुक ऑफ रेकॉर्ड च्या चेअरमन आणि मिस इंडिया डॉ. ईशा अग्रवाल यांनी डॉ. सुप्रिया चिकोडी यांचे अभिनंदन केले.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तके देणे हा उद्देश नसून, पुस्तकांच्या माध्यमातून त्यांच्या मनाशी संवाद साधणे आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टी देणे हा त्यामागील व्यापक विचार आहे.

डॉ. सुप्रिया चिकोडी यांनी स्वतः लिहिलेली 'मन मंदिर', 'मनाचा गाभारा' आणि 'आईचं पत्र सापडलं..!!' ही पुस्तके बालिंगा हायस्कूल, छत्रपती शाहू विद्यालय यांसह कोल्हापूर शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना वितरित केली. मानसिक स्वास्थ्य, भावनिक समज, सकारात्मक विचार आणि जीवनमूल्यांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा प्रमुख हेतू आहे.

या उपक्रमाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमास विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड चे अध्यक्ष डॉ. दीपक हरके, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष एम. बी. शेख, ब्रह्माकुमारी डॉ. रश्मी दीदी, रोटरीचे असिस्टंट गव्हर्नर्स डॉ. मेघराज चुघ आणि ॲड. अभय बिचकर, विविध शाळांचे शिक्षक व कोल्हापुरातील विविध रोटरी क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते.

विक्रम हा केवळ आकडा नसून, तो समाजासाठी काही सकारात्मक करण्याची प्रेरणा ठरला पाहिजे, या भावनेतून झालेला हा उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत जीवनमूल्ये, सकारात्मक विचार आणि मानसिक सक्षमीकरणाचा संदेश पोहोचवणारा ठरला आहे.२,३०० पुस्तकांचे वितरण करून विश्वविक्रमाची नोंद करण्यासोबतच हजारो विद्यार्थ्यांच्या हातात ज्ञान, विचार आणि प्रेरणेची पुस्तके पोहोचविण्याचा हा उपक्रम कोल्हापुरात विशेष चर्चेचा विषय ठरला आहे.

# गणेशोत्सवाच्या काळात जिल्ह्यातील मांसविक्रीची दुकाने बंद ठेवावीत

## विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



गणेशोत्सवाच्या काळात जिल्ह्यातील कत्तलखाने व मांसविक्रीची दुकाने बंद ठेवण्याचे मागणीचे निवेदन विश्व हिंदू परिषद व बजरंग दलातर्फे जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

नगर – आगामी श्री गणेशोत्सवाचे धार्मिक पावित्र्य आणि शांततामय वातावरण राखण्यासाठी उत्सवाच्या कालावधीत जिल्ह्यातील सर्व कत्तलखाने तसेच मांसविक्रीची दुकाने बंद ठेवण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल, अहिल्यानगर यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, श्री गणेशोत्सव हा हिंदू समाजाच्या श्रद्धेचा, आस्थेचा आणि धार्मिक भावनेचा अत्यंत महत्त्वाचा सण आहे. या काळात संपूर्ण जिल्ह्यात घरोघरी तसेच सार्वजनिक मंडळांमध्ये श्रद्धेने श्री गणेशाची प्रतिष्ठापना, पूजा–अर्चा, धार्मिक विधी आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

या पवित्र धार्मिक उत्सवादरम्यान भाविकांच्या धार्मिक भावना व आस्था यांचा आदर राखला जावा, यासाठी गणेशोत्सवाच्या संपूर्ण काळात जिल्ह्यातील कत्तलखाने व मांसविक्री दुकाने बंद ठेवण्याबाबत प्रशासनाने तातडीने अधिकृत आदेश जारी करावेत. प्रशासनाने योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री राजेंद्र चुंबळकर, तसेच बजरंग दलाचे जिल्हा संयोजक सोमनाथ चितळकर, सहसंयोजक दत्ताभाऊ गायकवाड, मंथन डागवाले, पै.श्रेयश लोंढे आदी उपस्थित होते.

# श्रीरामपूरच्या मराठी पत्रकार संघ अध्यक्षपदी करण नवले, तर कार्याध्यक्षपदी ॲड.बाळासाहेब आगे यांची सर्वानुमते निवड





श्रीरामपूर – शहर व तालुक्यातील पत्रकारांमध्ये शहरी–ग्रामीण, छोटे–मोठे तसेच प्रिंट–इलेक्ट्रॉनिक माध्यम असा कोणताही भेदभाव न ठेवता सर्व पत्रकारांनी एकदिलाने काम करण्याचा निर्धार केला. श्रीरामपूर येथील व्ही.आय.पी. विश्रामगृहात झालेल्या बैठकीत मराठी पत्रकार संघ, श्रीरामपूरच्या अध्यक्षपदी करण नवले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

ज्येष्ठ पत्रकार रमण मुथा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस संघाचे मार्गदर्शक रमेश कोठारी, नागेश सावंत, सुनील कुलकर्णी तसेच संस्थापक अध्यक्ष प्रदीप आहेर उपस्थित होते. यावेळी संघाच्या कार्यकारी मंडळाचीही निवड करण्यात आली. कार्याध्यक्षपदी ड. बाळासाहेब आगे, उपाध्यक्षपदी मनोज आगे व महेश रक्ताटे, सचिवपदी सुरेश कांगुणे, खजिनदारपदी राहुल मुथा आणि संघटकपदी भाऊसाहेब काळे यांची एकमताने निवड झाली.

तसेच सहसचिवपदी सलीमखान पठाण, सहखजिनदारपदी सचिन उघडे यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून प्रदीप आहेर, सुनील कुलकर्णी, जयेश सावंत आणि पूनम करण नवले यांचा समावेश करण्यात आला.

नवनिर्वाचित अध्यक्ष करण नवले यांनी यावेळी बोलताना, पत्रकार संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांमध्ये समानतेची भावना अधिक बळकट करण्याची गरज व्यक्त केली. पत्रकारितेची गरिमा आणि विश्वासार्हता जपतानाच पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी संघटितपणे आवाज उठविणे, पत्रकारांसाठी प्रशिक्षण उपक्रम राबविणे तसेच शासनाच्या पत्रकारांसाठी असलेल्या विविध योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

शहर असो अथवा ग्रामीण भाग, वर्तमानपत्र असो अथवा इलेक्ट्रॉनिक मीडिया, छायाचित्रकार असो व जाहिरात प्रतिनिधी, प्रत्येक पत्रकार हा संघटनेचा समान घटक आहे. पत्रकारांच्या हितासाठी सर्वांनी मतभेद बाजूला ठेवून एकदिलाने काम केले पाहिजे, असे आवाहन नवले यांनी केले.

यावेळी पत्रकार संतोष बनकर, देविदास देसाई, साईनाथ बनकर, दिलीप तांबे, नितीन चित्ते, महेश देशपांडे, दिलीप दायमा, किशोर साळुंके, मंगेश लबडे, अमोल कदम, जयराज रणदिवे, सुधीर लोळगे यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन संतोष मते यांनी केले. संघाच्या नव्या कार्यकारिणीचे उपस्थित पत्रकारांनी अभिनंदन करून आगामी काळात श्रीरामपूर तालुक्यातील पत्रकारांच्या प्रश्नांसाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# बालक मंदिर महिला मंडळ शाळेमध्ये माता-पालक सभा




बालक मंदिर महिला मंडळ शाळेत श्रावणी शुक्रवारच्या निमित्ताने माता पालक सभा व हळदी कुंकवाचा कार्यक्रम रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनी या सदस्यांच्या उपस्थितीत झाला.

नगर – बालक मंदिर महिला मंडळ शाळेत ११ सप्टेंबर रोजी श्रावणी शुक्रवारच्या निमित्ताने माता पालक सभा व हळदी कुंकवाचा कार्यक्रम रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनी या सदस्यांच्या उपस्थितीत झाला. दरवर्षीप्रमाणे बालक मंदिर महिला मंडळ शाळेमध्ये श्रावणी शुक्रवारच्या निमित्ताने हळदी कुंकू समारंभ व माता पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून रोटरी प्रियदर्शिनीच्या नूतन अध्यक्षा सौ. प्रभा खंडेलवाल, तसेच सेक्रेटरी सुरेखा मणियार या उपस्थित होत्या. तसेच रोटरीच्या सदस्या विभा तांबडे, सौ. मीनल गंधे, देविका रेळे, सविता काळे, अपूर्वा कुलकर्णी आदी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात शारदास्तवनाने झाली. याप्रसंगी प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापक सौ अस्मिता शूळ यांनी केले. शाळेला लाभलेली बहुमोल पूर्वपरंपरा, शिक्षकांचे अमूल्य योगदान, विद्यार्थ्यांसाठी राबवणारे विविध उपक्रम आणि स्पर्धा परीक्षेतील यश याबद्दल त्यांनी माहिती दिली. पाहुण्यांचा परिचय श्रीमती निरुपमा देशपांडे यांनी करून दिला. मंथन व एन एस ई मधील यशस्वी विद्यार्थी मिहीर घोटणकर व ज्ञानदा शिनगारे यांचा सत्कार करण्यात आला.

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनी यांनी बालक मंदिर महिला मंडळ शाळेला स्वच्छतेच्या साहित्याचे वाटप केले. तसेच याप्रसंगी उपस्थित माता पालकांबरोबर शाळेच्या शिक्षिका सौ.पवार यांनी संवाद साधला. विद्यार्थ्यांचा जेवणाचा डबा, स्वच्छता, शिस्त, संस्कार, गुड टच बॅड टच व आरोग्य जागृकता तसेच शाळेच्या वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांची तयारी या विषयांवर पालकांशी संवाद साधला. यावेळी शाळेसाठी डिजिटल इंटरॅक्टिव बोर्ड व इतर काही साहित्याची आवश्यकता आहे असे शाळेच्या शिक्षिका सौ. वैशाली सातपुते यांनी सांगितले.

याप्रसंगी पर्यावरण संवर्धन या विषयावर शाळेच्या विद्यार्थिनींनी पथनाट्य सादर केले. मुलांनी लेझीमचे सादरीकरण केले. त्याला सर्व उपस्थित माता–पालक, मान्यवर अतिथी यांनी प्रतिसाद दिला. या कार्यक्रमासाठी महिला मंडळ शाळेच्या उपाध्यक्षा डॉ. सौ. विद्या होळेहोन्नूर, सेक्रेटरी श्रीमती ज्योती कुलकर्णी, खजिनदार सौ. मेधा धोपावकर, श्रीमती पुष्पा चितांबर, सौ.गौरी मुळे, सौ. उमा देशमुख या उपस्थित होत्या. याप्रसंगी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणातून बोलताना सौ. ज्योती केसकर यांनी पथनाट्य व लेझीम सादर करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. आभार प्रदर्शन सौ. सीमा कवाष्टे यांनी केले. फलक लेखन श्रीमती अश्विनी मेंद्रे यांनी केले. सौ हेमांगी भिडे व सौ. ठकू पवार यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

